# शोधकांसाठी

## पवित्रशास्त्र अभ्यासमालिका

# SEEKERS

## *Bible Study Series*



# शोधकांसाठी

## पवित्र शास्त्र अभ्यासमालिका

**Published by**
**World Literature Publications**
F-5, Siyon Nagar, Pahadsingpura,
Aurangabad - 431 001. (M.S.) INDIA
Cell : 09049941066,
E-mail : amuljoyce@rediffmail.com

**Cover Design : Betty Burton Choate**

**Language :** Marathi

**Copyright :** World Literature Publications,
Box - 72, Winona, MS 38967, USA.

**Translated in Marathi by :**
Amul Bansod

**<u>For Bible Courses, Literature & For more Copies</u>**
Bro. Amul Bansod (B.B.S., M.Th.)
F-5, Siyon Nagar, Pahadsingpura,
Aurangabad - 431 001. (M.S.) INDIA
Cell : 09049941066, E-mail : amuljoyce@rediffmail.com

# अनुक्रमणिका
## Contents

पवित्र शास्त्र ........................................................................०७
(The Bible)

येशू-देवाचा दैवी पुत्र ..............................................................१३
(Jesus - The Divine Son of God)

पापाची समस्या .....................................................................१८
(The Problem of Sin)

पापापासून तारण ...................................................................२४
(Salvation from sin)

पाण्याचा बाप्तिस्मा.................................................................३१
(Water Baptism)

मंडळी ...................................................................................३६
(The Church)

खरी उपासना .........................................................................४२
(True Worship)

ख्रिस्तामध्ये नवीन जीवन ..........................................................४८
(New Life in Christ)

# प्रस्तावना

पवित्र शास्त्र काय शिकवते हे तुम्हाला समजून घ्यावयाचे असेल, तर पवित्र शास्त्राच्या वैयक्तिक अभ्यासाला पर्याय नाही. प्रथम तुम्ही पवित्र शास्त्र वाचा. दुसरी गोष्ट म्हणजे, तुम्हाला शिकण्यास मदत होईल अशा पद्धतशीर शिक्षण देणाऱ्या पवित्र शास्त्राभ्यासक्रमाची निवड करा, आणि जे पाठ तुम्ही शिकत आहात ते पूर्णपणे पवित्र शास्त्राच्या शिक्षणावर आधारित आहे, तसेच ते सुस्पष्ट आणि समजण्यायोग्य आहेत याची खात्री करून घ्या.

साधारण दोन वर्षांपूर्वी मी फिलिपाईन्सच्या भेटीवर असतांना, इंटरनेटवरवून घेतलेला एक अभ्यासक्रम माझ्या पाहण्यात आला. तेथील बंधुजन त्याचा उपयोग करीत होते. तो अभ्यासक्रम चाळल्यावर माझ्या लक्षात आले की, तो पवित्र शास्त्राला धरून आणि वाचण्यास सोपा आहे. ख्रिस्ती विश्वासणारा आणि प्रभूच्या मंडळीचा घटक होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टीचा उहापोह त्यात केला होता. तसेच तो संक्षिप्त किंवा छोटासा होता. उगाचच डझनांपेक्षा जास्त पाठांपर्यंत तो ताणला नव्हता म्हणून येथे भारतात आपल्या इतर शास्त्राभ्यासक्रमांत त्याचा समावेश करण्याचा निर्णय मी घेतला.

वेगवेगळे पाठ छापण्याऐवजी आम्ही हा ८ पाठांचा अभ्यासक्रम पुस्तकाच्या स्वरूपात छापला आहे. प्रत्येक पाठाच्या अखेरीस दोन दोन

पानांची प्रश्नपत्रिका जोडली आहे. त्यांची रचना अशा प्रकारे केली आहे की, एका पाठाचा अभ्यास संपवल्यावर त्याच्या शेवटी दिलेले प्रश्न सोडवून ती पाने फाडून तपासण्यासाठी तुम्हाला आमच्याकडे पाठवता यावीत. अशा प्रकारे पुढील अभ्यासासाठी पुस्तक व्यवस्थित राहील.

तुम्ही दोन पाठांचा अभ्यास करावा, मग त्या दोन पाठांवरील प्रश्नांची उत्तरे लिहावीत आणि आमच्याकडे तपासण्यासाठी पाठवावीत असे आम्ही सुचवतो. तपासून गुण दिलेली ही पाने पुन्हा तुमच्याकडे आल्यावर तुम्ही पुढील दोन पाठांचा अभ्यास करावा. संपूर्ण अभ्यासक्रम संपेपर्यंत तुम्ही असे करावे. तुम्ही जर या पद्धतीच अवलंब कराल, तर या अभ्यासक्रमाद्वारे तुम्हाला नक्कीच खूप फायदा होईल.

जर तुम्हाला काही प्रश्न, समस्या असतील किंवा दुसरा अभ्यासक्रम करायचा असेल तर कृपया आम्हाला कळवा. तुमच्या या अभ्यासात देवाने तुम्हाला आशीर्वाद द्यावा, तसेच तुमच्या मित्रांना या अभ्यासक्रमासाठी यायला तुम्ही आमंत्रण द्यावे म्हणून आम्ही तुम्हाला उत्तेजन देत आहोत.

**जे.सी.चोट**
यु.एस.ए.

**J.C. Choate**
USA

*पाठ एक*

**SEEKERS**

# पवित्र शास्त्र
# THE BIBLE

पवित्र शास्त्र म्हटले जाणारे हे पुस्तक नक्की आहे तरी काय? १६०० वर्षांच्या कालावधीत (ख्रि.पू. अंदाजे १५०० ते इ.स. १००) निरनिराळ्या ४० माणसांनी लिहिलेल्या पुस्तकाचा हा संग्रह आहे. या माणसांनी स्वतःचे ज्ञान किवा माहिती इतरांना शिकावी म्हणून लिहिली नाही. त्यांनी लिहिलेले शब्द लिहिण्यासाठी देवाने त्यांना प्रेरणा दिली होती.

''कारण संदेश मनुष्यांच्या इच्छेने कधी आलेला नाही; तर पवित्र आत्म्याने प्रेरित झालेल्या मनुष्यांनी देवापासून आलेला संदेश सांगितला आहे'' (२ पेत्र १:२१).

दुसरे एक वचन आपल्याला सांगते की, ''प्रत्येक परमेश्वरप्रेरित शास्त्रलेख सद्‌बोध, दोष दाखवणे, सुधारणूक, नीतिशिक्षण ह्याकरता उपयोगी आहे, ह्यासाठी की देवाचा भक्त पूर्ण होऊन चांगल्या कामासाठी सज्ज व्हावा'' (२ तीमथ्थ ३:१६,१७).

हे शब्द जरी माणसांनी लिहिले असले तरी संदेशाचा लेखक देव आहे. मानवजातीने जी सत्ये समजून घेणे गरजेचे आहे ती सत्ये पवित्र शास्त्र प्रगट करते. पवित्र शास्त्रातील मजकूर महत्त्वाचा असल्यामुळे, देवाच्या प्रगटीकरणाचा अर्थ आपण आपल्या सोयीनुसार लावू नये, अर्थाची मोडतोड करू नये अशी ताकीद देवाने दिली आहे. देवाचे जे नियमशास्त्र मोशेने इस्राएल लोकांना सांगितले, त्यात असे म्हटले आहे:

''जी आज्ञा मी तुम्हाला देत आहे तिच्यात काही अधिक उणे करू नका. अशासाठी की, तुमचा देव परमेश्वर ह्याच्या ज्या ज्या आज्ञा मी तुम्हाला देत आहे त्या तुम्ही पाळाव्यात'' (अनु. ४:२)

पवित्र शास्त्र नक्की काय शिकवते हे समजून घेणे फार महत्त्वाचे आहे; अन्यथा आपल्याला देवाची इच्छा समजणार नाही, किंवा आपण त्याला संतुष्ट करू शकणार नाही. ज्यांनी देवावर प्रीती केली आणि त्याच्या इच्छेप्रमाणे केले केवळ त्यांनाच देव पारितोषिक देईल.

''मला 'प्रभुजी,प्रभुजी' असे म्हणणाऱ्या प्रत्येकाचा प्रवेश स्वर्गाच्या राज्यात होईल असे नाही; तर जो माझ्या स्वर्गीय पित्याच्या इच्छेप्रमाणे वागतो त्याचा होईल'' (मत्तय ७:२१).

**कोणता देव ?**

आजच्या जगात पुष्कळ देव आहेत; मग मनात प्रश्न येतो की, ''तुम्ही कोणत्या देवाविषयी बोलत आहात ? २००० वर्षांपूर्वी, पौल अथेन्सला आला तेव्हा त्याला या प्रश्नाचा सामना करावा लागला. ते शहर ''मूर्तींनी भरलेले होते'' (प्रे.कृ. १७:१६). पौल येशूविषयी (जो या मालिकेतील दुसऱ्या पाठाचा विषय आहे) शिकवत होता, पण ही शिकवण त्यांना वेगळी वाटली म्हणून त्यांनी पौलाला अधिक स्पष्टीकरण करायला सांगितले.

''अहो अथेनैकरांनो, तुम्ही सर्व बाबतींत देवदेवतांना फार मान देणारे आहात असे मला दिसते. कारण मी फिरता फिरता तुमच्या पूज्य वस्तू पाहताना, *'अज्ञात देवाला'* ही अक्षरे लिहिलेली वेदी मला आढळली. ज्यांचे तुम्ही अज्ञानाने भजन करता ते मी तुम्हाला जाहीर करतो. ज्या देवाने जग व त्यातले अवघे निर्माण केले तो स्वर्गाचा व पृथ्वीचा प्रभू असून हातांनी बांधलेल्या मंदिरात राहत नाही; आणि त्याला काही उणे आहे, म्हणून माणसांच्या हातून त्याची सेवा घडावी असेही नाही; कारण जीवन, प्राण व सर्व काही तो स्वत: सर्वांना देतो (प्रे.कृ.१७:२२-२५ पवित्र शास्त्रातील देव हा एखादे स्थानिक दैवत, किंवा अनेक देवांपैकी एक नाही; तो विश्वाचा देव आहे, या पृथ्वीवर आणि आकाशात तुम्हाला जे काही दिसते त्या सर्वाचा


तो निर्माणकर्ता आहे. पवित्र शास्त्रातील पहिल्या पुस्तकाचे पहिलेच वचन हे सत्य जाहीर करते.

''प्रारंभी देवाने आकाश व पृथ्वी ही उत्पन्न केली'' (उत्पत्ती १:१).

देव बहुवचनी आहे, हे उत्पत्तीचा हाच पहिला अध्याय आपल्याला प्रगट करतो. आपण केवळ देवाच्या आत्म्याविषयी वाचत नाही(उत्पत्ती १:२), तर आपण हेही वाचतो की, ''आपल्या प्रतिरूपाचा व आपल्याशी सदृश असा मनुष्य आपण करू'' (उत्पत्ती १:२६). वस्तुस्थिती अशी आहे की, दैवत्वात तीन व्यक्ती आहेत; **पिता, शब्द** (नवीन करारात येशू), आणि **पवित्र आत्मा**. हे तिघे एक आहेत. ''हे इस्त्राएला, श्रवण कर; आपला देव परमेश्वर हा अनन्य परमेश्वर आहे'' (अनु.६:४).

देव मनुष्यासारखा नाही असेही पवित्र शास्त्र आपल्याला सांगते. बाह्यत: आपण मांस व रक्त आहोत (आपला आत्मा आतमध्ये राहतो), पण''देव आत्मा आहे''(योहान ४:२४).

**निर्मित वस्तू** या नात्याने आपण **आपला निर्माता** देव याच्यापेक्षा निराळ्या पातळीवर असल्यामुळे, आपण या देहात आहोत तोपर्यंत देवाचा स्वभाव आपल्याला पूर्णपणे कदाचित कधीच समजणार नाही, पण आपल्याला त्याचे व्यक्तित्व आणि त्याची इच्छा समजू शकते- कारण या गोष्टी त्याने पवित्र शास्त्रात प्रगट केल्या आहेत.



पवित्र शास्त्र काय आहे ?

पवित्र शास्त्र दोन भागात विभागलेले आहे. **जुना करार** आणि **नवीन करार** हे दोन प्रमुख भाग आहेत. जुना करारात **३९** आणि नवीन करारात **२७** अशी एकूण **६६** पुस्तके पवित्र शास्त्रात आहेत.

जुन्या करारातील पुस्तके ख्रि.पू. सुमारे १५०० ते ख्रि. पू४०० च्या

दरम्यान लिहिली गेली. जुन्या कराराचे चार प्रमुख भाग आहेत. मोशेने लिहिलेल्या **पाच पुस्तकांचा** पहिला गट होतो. याला नियमशास्त्र म्हणतात. त्यांच्यापैकी उत्पत्ती हे पहिले पुस्तक आपल्याला जगाच्या निर्मितीविषयी सांगते आणि मानवाच्या अस्तित्वाच्या पहिल्या २,००० वर्षांतील महत्त्वाच्या घटनांचा सारांश सांगते. केवळ आठ लोक सोडून बाकी सर्वांचा नाश करणाऱ्या महापुराचाही यात समावेश आहे.

महापुरानंतर मानवाने पुन्हा देवाविरुद्ध बंड केले; म्हणून त्याने (देवाने) खास उद्देशाने अब्राहाम या माणसाची निवड केली. त्याचे वंशज (ज्यांना इस्राएल राष्ट्र म्हटले जाऊ लागले) देवाची खास प्रजा झाले. देवाने आपले पवित्र नियमशास्त्र त्यांना मोशेद्वारे दिले. आणि ज्यांच्यामधून येशू या जगात जन्म घेणार होता असे राष्ट्र बनण्याचा सन्मान त्यांना मिळाला.

आमच्या पापांपासून आम्हाला क्षमा मिळावी म्हणून आमच्या पापांची किंमत भरण्यासाठी येशू या जगात आला.

उत्पत्तीच्या पुस्तकाची अखेर होत असताना, देवाचे लोक इजिप्त देशात राहत असतात. **निर्गम**च्या पुस्तकात आपण पाहतो की, इस्राएल लोकांना गुलाम बनवण्यात आले; त्यांना बंधमुक्त करण्यासाठी देव मोशेला पाठवतो. नंतर देव त्यांना नियमशास्त्र देतो, त्यांनी त्याची उपासना करावी अशी त्याची इच्छा आहे (लेवीय, गणना आणि अनुवाद).

जुन्या करारातील नंतरच्या **बारा** पुस्तकांत (**यहाशवा** ते **एस्तेर**) इस्राएलच्या पुढील एक हजार वर्षांच्या इतिहासाची नोंद केली आहे. **ईयोब, स्तोत्रसंहिता, नीतीसूत्रे, उपदेशक** आणि **गीतरत्न** या पुस्तकांचे वर्णन 'सुज्ञतेचे साहित्य' असे केले जाते. ही पुस्तके काव्यस्वरूपात आहेत, त्यात गीते, नाटक आणि नीतीसूत्रे आहेत. इस्राएलाच्या हजार वर्षांच्या इतिहासकाळात ज्या संदेष्ट्यांनी शिक्षण दिले, त्यांनी शेवटची **सतरा** पुस्तके

लिहिली आहेत.

आमच्या पापांपासून आम्हाला मुक्त करण्यासाठी आलेल्या येशूवर नवीन करार आमचे लक्ष केंद्रित करतो. त्याचे या जगातील जीवन हा **मत्तय, मार्क, लूक** आणि **योहान** या पुस्तकांचा विषय आहे. कुमारीच्या पोटी झालेला त्याचा जन्म, त्याची शिकवण, आमच्या पापांसाठी वधस्तंभावरील त्याचा मृत्यू, कबरेत त्याला पुरले जाणे आणि मृतांतून त्याचे पुनरुत्थान याविषयी या पुस्तकांत सांगितले आहे.

येशूने आम्हाला आमच्या पापांपासून सोडवले आहे ही सुवार्ता मानवजातीला सांगण्याने **प्रेषितांची कृत्ये** या पुस्तकाची सुरवात होते. पापक्षमा 'उपलब्ध आहे ! तसेच, तारण झालेल्या आपणा सर्वांना देव मंडळीत म्हणजे विश्वासणाऱ्यांच्या समुहात ठेवतो. येशू हा तिचा (मंडळीचा) प्रमुख किंवा मस्तक आहे.

**रोमकरास पत्र** ते **यहुदाचे पत्र** या पुस्तकांत ख्रिस्ती जीवनशैलीविषयी सांगितले आहे. ख्रिस्ताचे दुसरे आगमन होऊन या पृथ्वीचा विनाश होईपर्यंत आणि सर्वांचा आपापल्या कृत्यांनुसार न्याय होईपर्यंत, आपण देवाची उपासना आणि सेवा कशी करावी हे त्यात सांगितले आहे.

**प्रकटीकरण** हे भविष्य संदेशात्मक पुस्तक आहे; देवाला आमची काळजी आहे आणि या जगात जरी आपल्याला परीक्षा आणि अडचणींचा सामाना करावा लागला, तरी आपण जी देवाची जी विश्वासू मुले त्यांना तो प्रतिफळ देतो याची ते आपल्याला खात्री देते.

नवीन करारातील सर्व पुस्तके इ. स. ४० ते इ.स. १०० च्या दरम्यान लिहिली गेली.

• • •

# पवित्र शास्त्र

- देवाचे मन, मानवाची स्थिती, तारणाचा मार्ग, पाप्यांचा नाश आणि विश्वासणाऱ्यांचा आनंद याविषयी **पवित्र शास्त्र** सांगते.
- त्याची सिद्धांत तत्त्वे पवित्र आहेत, त्यातील नियम बंधनकारक आहेत, त्यात सांगितलेला इतिहास खरा आहे, आणि त्यातील निर्णय न बदलणारे आहेत.
- सुज्ञ होण्यासाठी ते वाचा, सुरक्षित राहण्यासाठी त्यावर विश्वास ठेवा, आणि पवित्र होण्यासाठी त्याचे आचरण करा.
- तुम्हाला मार्ग दाखवण्यासाठी त्यात प्रकाश, तुम्हाला आधार देण्यासाठी अन्न आणि तुम्हाला आनंदित करण्यासाठी त्यात सात्वन आहे.
- ते वाटसरूचा नकाशा, यात्रेकरूची काठी,नाविकाचे/वैमानिकाचे होकायंत्र, सैनिकाची तरवार आणि ख्रिस्ती विश्वासणाऱ्याचा जाहीरनामा आहे.
- येथे स्वर्ग उघडला आहे आणि नरकाचे दरवाजे उघड केले आहेत. ख्रिस्त येशू हा याचा महान विषय आहे, आमचे कल्याण ही त्याची रचना आणि देवाचे गौरव हा त्याचा शेवट आहे.
- ते आमच्या स्मरणात राहिले पाहिजे,आमच्या अंत:करणावर त्याचे राज्य असले पाहिजे आणि आमच्या पावलांना त्याने मार्ग दाखवला पाहिजे.
- ते सावकाश, नियमितपणे आणि प्रार्थनापूर्वक वाचा.
- ते संपत्तीची खाण, आत्म्यासाठी आरोग्य आणि आनंदाची नदी आहे.
- या जीवनात ते तुम्हाला दिले आहे, न्यायाच्या वेळी उघडले जाईल आणि ते सर्वकाळ सुस्थापित आहे.
- त्यात सर्वोच्च जबाबदारी, विश्वासू सेवेकऱ्यासाठी अभिवचने आणि प्रतिफळ आहे, आणि त्यातील पवित्र आशयाकडे दुर्लक्ष करतात त्यांचा धिक्कार केला आहे.

*पाठ दोन*

**SEEKERS**

# येशू- देवाचा दैवी पुत्र
## JESUS - THE DIVINE SON OF GOD

''ह्या पुस्तकात लिहिली नाहीत अशी दुसरीही पुष्कळ चिन्हे येशूने आपल्या शिष्यांदेखत केली. येशू हा देवाचा पुत्र ख्रिस्त आहे असा तुम्ही विश्वास ठेवावा, आणि विश्वास ठेवून तुम्हाला त्याच्या नावाने जीवन प्राप्त व्हावे म्हणून ही लिहिली आहेत'' (योहान २०:३०-३१).

पवित्र शास्त्रातील पहिलेच पुस्तक उत्पत्तीमध्ये देवाने पहिला मनुष्य (आदाम) आणि पहिली स्त्री (हव्वा) यांना आपल्या प्रतिरूपाचे बनवले आणि त्यांना एका परिपूर्ण जगात, एदेन बागेत ठेवले. त्यांनी पाळावी म्हणून देवाने त्यांना एक आज्ञा दिली, पण त्यांनी ती मोडली. देवाची आज्ञा मोडण्याला पाप म्हणतात. आपण आदाम आणि हवेप्रमाणे आहोत, आपणही पाप केले आहे. ''पापाचे वेतन मरण आहे'' (रोम ६:२३). हे मरण केवळ शारीरिक मरण नाही (आत्म्याचे देहापासून वेगळे होणे), तर हे मरण म्हणजे देवापासून सर्वकाळासाठी विभक्त होणे. २ थेस्सल १:७-९ मध्ये आपण येशूविषयी वाचतो.

''म्हणून प्रभू येशू प्रकट होण्याच्या समयी ते होईल; तो आपल्या सामर्थ्यवान दूतांसह स्वर्गातून अग्निज्वालेसहित प्रकट होईल. तेव्हा जे देवाला ओळखत नाहीत व आपल्या प्रभू येशूची सुवार्ता मानत नाहीत त्यांचा तो सूड उगवील. आपल्या पवित्र जनांच्या ठायी गौरव मिळावा म्हणून, आणि त्या दिवशी विश्वास ठेवणाऱ्या सर्वांच्या ठायी आश्चर्यपात्र व्हावे म्हणून तो येईल.''

सार्वकालिक शिक्षा टाळण्यासाठी आपण देवाकडे आले पाहिजे आणि सुवार्तेचे पालन कसे करावे हे शिकले पाहिजे. पवित्र शास्त्र आपल्याला देव

प्रकट करते, आणि तारण कसे मिळवावे हे आपल्याला सांगते. मनुष्याला त्याच्या पापापासून सोडवण्याची देवाची योजना अपल्याला प्रथम एदेन बागेत दिसते. मानवाच्या पापासाठी तो शिक्षा जाहीर करीत होता, त्याच वेळी त्याने त्याच्या सुटकेचे अभिवचनसुद्धा दिले (उत्पत्ती ३:१५).

नंतर, आपले खास लोक म्हणून देवाने अब्राहाम व त्याच्या वंशजांची निवड केली, तेव्हा त्याने ''पृथ्वीवरील सर्व राष्ट्रे तुझ्या संततीच्या द्वारे आशीर्वादित होतील'' (उत्पत्ती २६:४ आणि २८:१४) असे अभिवचन दिले. सर्व राष्ट्रांना आशीर्वादित करणारे हे संतान म्हणजे येशू (गलती ३:१६). जुन्या करारानुसार अब्राहामाच्या संततीद्वारे (इस्राएल राष्ट्र) जगात जो येणार होता तो येशू आहे; तसेच येशू हा नवीन कराराचा विषयही आहे.



## येशू अद्वितीय आहे

येशू २००० वर्षांपूर्वी जन्मला होता. एकाच वेळी परिपूर्ण मनुष्य आणि देव असणारा असा केवळ तोच एक व्यक्ती आहे. हे समजायला कठीण वाटेल, पण पवित्र शास्त्र त्याचे स्पष्टीकरण करते.

''प्रारंभी शब्द होता, शब्द देवासह होता'' (योहान १:१).

''शब्द देही झाला, आणि त्याने आमच्यामध्ये वस्ती केली आणि आम्ही त्याचे गौरव पाहिले. ते पित्यापासून आलेल्या एकुलत्या एकाचे गौरव असावे असे अनुग्रह व सत्य ह्यांनी परिपूर्ण होते'' (योहान १:१४).

दैहिकदृष्ट्या येशू अब्राहामाचे संतान होता. पण तो देवत्वातील एक व्यक्तीदेखील आहे. देव (शब्द) मनुष्य, आमच्यापैकी एक झाला.

''कारण ख्रिस्ताच्या ठायीच देवपणाची सर्व पूर्णता मूर्तिमान वसते''

(कलस्सै २:९).

येशूला एक मानवी आणि एक दैवी पालक होता. जी त्याची आई होणार होती, त्या एक तरुण स्त्रीशी बोलून देवदूताने म्हटले,

''पाहा, तू गरोदर राहशील व तुला पुत्र होईल. त्याचे नाव येशू ठेव'' (लूक १:३१).

''मरीयेने देवदूताला म्हटले, हे कसे होईल? कारण मला पुरुष ठाऊक नाही, देवदूताने उत्तर दिले, पवित्र आत्मा तुझ्यावर येईल आणि परात्पराचे सामर्थ्य तुझ्यावर छाया करील; म्हणून ज्याचा जन्म होईल त्याला पवित्र, देवाचा पुत्र असे म्हणतील'' (लूक १:३४,३५).

पण, येशू अर्धा मनुष्य आणि अर्धा देव होता असे नाही. त्याचे मनुष्यत्व दाखवण्यासाठी कधीकधी त्याने स्वतःचा उल्लेख ''मनुष्याचा पुत्र'' असे म्हटले. पवित्र शास्त्रात ''..चा पुत्र'' म्हणजे संबंधित व्यक्तीच्या ठायी त्याच्या मातापित्याची सर्व गुणवैशिष्ट्ये आहेत, असा होतो. अशा प्रकारे तो एकाच वेळी पूर्ण मनुष्य आणि पूर्ण देव होता. एक मनुष्यप्राणी म्हणून या जगात जगण्यामध्ये त्याने केवढी नम्रता दाखवली.

''अशी जी चित्तवृत्ती ख्रिस्ती येशूच्या ठायी होती ती तुमच्याठायीही असो; तो देवाच्या स्वरूपाचा असूनही देवाच्या बरोबरीचे असणे हा लाभ आहे असे त्याने मानले नाही,तर त्याने स्वतःला रिक्त केले,म्हणजे मनुष्याच्या प्रतिरूपाचे होऊन दासाचे स्वरूप धारण केले;आणि मनुष्यप्रकृतीचे असे प्रकट होऊन त्याने मरण आणि तेही वधस्तंभावरचे मरण सोसले; येथपर्यंत आज्ञापालन करून त्याने स्वतःला लीन केले''(फिलिप्पै २:५-८).

## येशू सार्वकालिक आहे

एके प्रसंगी येशूने यहुदी लोकांना सांगितले, ''अब्राहामाचा जन्म झाला त्यापूर्वी **मी आहे**'' (योहान ८:५८). मानवप्राणी म्हणून येशूचा जन्म होण्याच्या २००० वर्षे अगोदर जरी अब्राहाम होऊन गेला होता, तरी येशूचे वास्तविक अस्तित्व त्याच्या फार पूर्वीचे आहे. ''मी आहे'' या त्याच्या शब्दावरून तो सार्वकालिक आहे हे

दिसते. येशूला पित्याने जगात पाठवले (योहान ५:२३). तो स्वर्गातून आला (योहान ६:३८), आणि तो पुन्हा स्वर्गात गेला (योहान १३:३). तो देवाच्या बरोबरीचा आहे हे येशूने स्पष्ट केले (योहान ५:१७,१८); म्हणून यहुदी लोक त्याला मारू इच्छित होते.

**तारक येशू**

येशू या नावाचा अर्थ ''तारणारा'' असा होतो. त्याचे नाव येशू ठेव असे त्याची आई मरिया हिला सांगण्यात आले होते (लूक १:३१). का? मत्तय १:२१ वचनानुसार,

''कारण तोच आपल्या प्रजेला त्यांच्या पापांपासून तारील.''

या एकाच उद्देशाने तो स्वर्ग सोडून पृथ्वीवर आला. पण दृश्य स्वरूपात तो इतर सर्व माणसांसारखाच दिसत असल्याने, लोकांना पापांपासून तारणारा देवाचा पुत्र मी आहे हे त्याला दाखववे लागले. त्याने केलेले चमत्कार, चिन्हे आणि अद्‌भुते यांच्याद्वारे त्याने आपली ओळख दाखवली. (या पाठाच्या सुरवातीचा परिच्छेद पुन्हा वाचा.)

३८ वर्षे **चालू न शकणाऱ्या** माणसाला येशूने बरे केले (योहान ५:५-९). पाच भाकरी आणि दोन मासे घेऊन त्याने ५,००० लोकांना **जेवू घातले** (योहान ६:९-१४). जन्मापासून अंध असलेल्या माणसाला त्याने **दृष्टी दिली** (योहान ९:१-७). त्याने लाजराला **मेलेल्यांतून उठवले** (योहान ११:३८-४४)! त्याने केलेल्या चमत्कारांपैकी फक्त काहींचा उल्लेख येथे केला आहे. या चमत्कारांचा परिणाम काय झाला ते पवित्र शास्त्रातील अनेक परिच्छेदांत सांगितले आहे.

''वल्हांडणाच्या सणात यरूशलेम येथे असताना जी चिन्हे तो करत होता ती पाहून पुष्कळांनी त्याच्या नावावर विश्वास ठेवला'' (योहान २:२३).

''तेव्हा मोठा लोकसमुदाय त्याच्या मागोमाग चालला, कारण आजारी लोकांसाठी जी चिन्हे तो करत असे ती त्यांनी पाहिली होती'' (योहान ६:२).

''तो रात्रीचा त्याच्याकडे येऊन त्याला म्हणाला, गुरूजी, आपण

देवापासून आलेले शिक्षक आहात. हे आम्हाला ठाऊक आहे; कारण ही जी चिन्हे आपण करता ती देव बरोबर असल्यावाचवून कोणालाही करता येत नाहीत'' (योहान ३:२).

येशूने लाजराला मेलेल्यांतून उठवले तेव्हा पुष्कळ यहुद्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला, पण प्रमुख याजकांना त्याचा मत्सर वाटला आणि त्यांनी त्याला ठार मारण्याचा निश्चय केला (योहान १२:९-११), आणि कालांतराने त्यांनी तसे केले. संपूर्ण जगाच्या पापांसाठी प्रायश्चित्त म्हणून येशूला वधस्तंभावर मरू द्यावे ही देवाची जगाच्या प्रारंभापासून योजना होती. आमची जागा घेण्यास तो पात्र ठरला, कारण तो **निष्कलंक** होता. पण देवाने त्याला मेलेल्यांतून उठवले. पेन्टेकॉस्टच्या दिवशी दिलेल्या सुवार्तासंदेशात या पेत्राने घटना सांगितल्या.

''अहो इस्राएल लोकांनो, ह्या गोष्टी ऐका; नासोरी येशूच्याद्वारे देवाने जी महत्कृत्ये, अद्भुते व चिन्हे तुम्हाला दाखवली त्यावरून देवाने तुमच्याकरता पाठवलेला असा तो मनुष्य होता, ह्याची तुम्हाला माहिती आहे. तो देवाच्या ठाम संकल्पानुसार व पूर्वज्ञानानुसार तुमच्या स्वाधीन झाल्यावर तुम्ही त्याला धरून अधर्म्यांच्या हातांनी वधस्तंभावर खिळून मारले'' (प्रे.कृ. २:२२,२३).

''त्या येशूला देवाने उठवले ह्याविषयी आम्ही सर्व साक्षी आहोत'' (प्रे.कृ. २:३२).''म्हणून इस्राएलाच्या सर्व घराण्याने हे निश्चयपूर्वक समजून घ्यावे की, ज्या येशूला तुम्ही वधस्तंभावर खिळून मारले त्याला देवाने प्रभू व ख्रिस्त असे करून ठेवले आहे'' (प्रे.कृ. २:३६).

येशूने पापी माणसांना त्याला वधस्तंभावर खिळू दिले, कारण याद्वारे त्याचे निष्कलंक रक्त आमच्या पापांसाठी ओतले गेले. आपल्या पापांची क्षमा आपल्याला कशी मिळेल हे पुढील दोन पाठांत आपण पाहणार आहोत.

• • •

*पाठ तीन*

**SEEKERS**

# पापाची समस्या
# THE PROBLEM OF SIN

एखादी गोष्ट चूक किंवा अयोग्य आहे हे माहीत असूनही तुम्ही ती कधी केली का? या चुकीच्या गोष्टींना पवित्र शास्त्र पाप म्हणते. सर्वसामान्य अर्थाने पाहू गेल्यास, पाप म्हणजे, देव आपल्याला नियम (किंवा आज्ञा) देतो, आणि आपण ती पाळण्याचे नाकारतो, तेव्हा आपण नियमशास्त्र विरहित होतो.

''जो कोणी पाप करतो तो स्वैराचार करतो; कारण पाप स्वैराचार आहे'' (१ योहान ३:४).

दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे, चोरी इ. सारख्या गोष्टी चूक आहेत असे पवित्र शास्त्र शिकवते. चोरांची गणती अधार्मिकांत केली जाते (१ करिंथ ६:९,१०), त्यांना स्वर्गाचे वतन मिळणार नाही. पौल स्पष्ट शब्दांत सांगतो की, ''चोरी करणाऱ्याने पुन्हा चोरी करू नये...'' (इफिस ४:२८). चोरी करणे चूक, अयोग्य आहे. आपण जर चोरी केली, तर आपण देवाचा नियम मोडला आहे.

पवित्र शास्त्र सत्य आहे, आणि **सत्याचा नाकार करणे** हे देखील पाप आहे. पापाविषयी चर्चा करणारे नवीन करारातील एक पुस्तक म्हणजे रोमकरास पत्र. मनुष्याला सत्य कधीच माहीत नव्हते असे नाही; पण त्याने सत्य नाकारले आणि सत्यापासून दूर गेला (रोम १:१८-२०). मानवजातीने देव आणि त्याच्या वचनाशी कसे वर्तन केले हे पुढील काही वचने दाखवतात.

''देवाला ओळखून सुद्धा त्यांनी देव म्हणून त्याचा गौरव केला नाही किंवा त्याचे आभार मानले नाहीत; पण ते आपल्या कल्पनांनी शून्यवत

झाले आणि त्यांचे निर्बुद्ध मन अंधकाराने भरून गेले. स्वत:ला शहाणे म्हणता म्हणता ते मूर्ख बनले; आणि अविनाशी देवाच्या गौरवाची, नाशवंत मनुष्य, पक्षी, चतुष्पाद पशू व सरपटणारे प्राणी ह्यांच्या प्रतिमांच्या रूपाशी त्यांनी अदलाबदल केली. ह्यामुळे ते आपल्या मनाच्या वासनांत असताना देवाने त्यांना अशुद्धतेच्या स्वाधीन केले; असे की, त्यांच्या देहांची त्यांच्या त्यांच्यातच विटंबना व्हावी. त्यांनी देवाच्या खरेपणाची लबाडीशी अदलाबदल केली, आणि निर्माणकर्त्याऐवजी निर्मितांची भक्ती व सेवा केली; तो निर्माणकर्ता तर युगानुयग धन्यवादित आहे. आमेन'' (रोम १:२१-२५).



सर्व माणसांना सत्य समजावे ही देवाची इच्छा आहे, म्हणून त्याने आपल्याला पवित्र शास्त्र दिले. पण आपण जर ते नाकारले, तर तो आपल्याला मूर्ख होऊ देतो. तो आपल्याला चूक, अयोग्य गोष्टींनी (ज्या गोष्टी सत्य नाहीत त्या) आंधळे होऊ देतो, आणि सार्वकालिकरित्या हरवूही देतो (२ करिंथ ४:३,४). खोट्या शिकवणुकींनी तो आपल्याला फसवले जाऊ देतो. त्यांनी सत्याची आवड धरायची ती धरली नाही'', (२ थेस्सल २:१०) म्हणून काही जणांचा नाश झाला आहे.

**इतर सर्व गोष्टींपेक्षा तुम्ही सत्यावर** अधिक प्रीती करता का ?

## सर्वांनी पाप केले आहे

आपली स्वत:ची खास प्रजा व्हावे म्हणून देवाने अब्राहाम आणि त्याच्या संततीची निवड केली तेव्हा जगात लोकांचे दोन वर्ग निर्माण झाले.

**अब्रामाची संतती** (ज्यांना नंतर यहुदी म्हणू लागले) आणि **परराष्ट्रीय** (जगातील इतर सर्व लोक). रोमकरांस पत्रात प्रेषित पौल स्पष्ट करतो की, यहुदी आणि परराष्ट्रीय दोघेही पापी आहेत. परराष्ट्रीयांनी सत्य नाकारले आणि ते मूर्तीची पूजा करू लागले; यहुदी लोकांना देवाचे पवित्र नियमशास्त्र दिले होते, पण त्यांनी ते पाळले नाही. प्रत्येकाने (यहुदी आणि परराष्ट्रीय) पाप केले आहे.

*''कारण सर्वांनी पाप केले आहे आणि ते देवाच्या गौरवाला उणे पडले आहेत''* (रोम ३:२३).

तुम्ही पाप केले आहे का ? अर्थातच केले आहे. प्रत्येक व्यक्तीने पाप केले आहे हे वरील वचन स्पष्ट करते.

तुम्हाला कदाचित प्रश्न पडेल, ''कोणकोणत्या प्रकारची पापे आहेत?'' खरे पाहता अनेक प्रकारची पापे आहेत. त्यांच्यापैकी काहींची यादी रोम १:२९-३२; १ करिंथ ५:११ आणि ६:९,१०, गलती ५:१९-२१; इफिस ४:२६-३२; २ तीमथ्य ३:१-५; आणि प्रकटी २१:८ मध्ये पाहायला मिळेल. पुढे पापांचे काही प्रकार दिले आहेत.

काही **दैहिक पापे** आहेत. अयोग्य प्रकारे दैहिक इच्छा पूर्ण करण्याशी याचा संदर्भ आहे. यात लैंगिक अनैतिकता (तुमची पत्नी किंवा पती नसणाऱ्या व्यक्तीशी लैंगिक संबंध ठेवणे), व्यभिचार, समलिंगी संबंध, पवित्र शास्त्राविरुद्ध घटस्फोट आणि पुनर्विवाह, दारूडेपणा, मौजमस्ती करणे इ. आपल्या लोकांनी पवित्र आणि शुद्ध असावे ही देवाची इच्छा आहे.

''तर तुम्हाला पाचारण करणारा जसा पवित्र आहे तसे तुम्हीही सर्व प्रकारच्या आचरणात पवित्र व्हा; कारण असा शास्त्रलेख आहे की, तुम्ही पवित्र असा, कारण मी पवित्र आहे'' (१ पेत्र १:१५,१६).

*''प्रियजनहो, जे तुम्ही प्रवासी व परदेशवासी आहात त्या तुम्हाला मी विनंती करतो की, जिवात्म्याबरोबर लढणाऱ्या दैहिक वासनांपासून दूर*

*राहा''* (१ पेत्र २:११).

गर्व, द्वेष, मत्सर, लोभीपणा, राग, हेवा, काही दृष्टिकोन, विचारदृष्टीची पापे आहेत, दुष्ट इच्छा, कृतघ्नपणा, क्षमा न करण्याची वृत्ती इ. सारखी काही **दृष्टिकोनाची पापे** आहेत. यापैकी काही पापे जिभेने व्यक्त केली जातात, तिच्यावर नियंत्रण ठेवण्याचा इशारा आपल्याला देण्यात आला आहे.

''तेव्हा प्रियजनहो, आपणाला ही अभिवचने मिळाली आहेत, म्हणून देहाच्या व आत्म्याच्या सर्व अशुद्धतेपासून आपण स्वत:ला शुद्ध करू आणि देवाचे भय बाळगून पावित्र्याला पूर्णता आणू'' (२ करिंथ ७:१).

आपण चुकीच्या किंवा अयोग्य गोष्टी करू नयेत एवढेच नाही तर ज्या चांगल्या आणि योग्य गोष्टी आहेत त्यासुद्धा आपण केल्या पाहिजेत.

''चांगले करणे कळत असून जो ते करत नाही त्याचे ते पाप आहे'' (याकोब ४:१७).

पापाचे वेतन

आपण पाप करतो तेव्हा काय होते? देवासोबतची आपली सहभागिता आपण गमावतो. मानवाच्या अस्तित्वाच्या अगदी सुरूवातीलाच, आदाम आणि हव्वा यांनी पाप केले तेव्हा देवासोबतचे आपले विशेष नाते ते गमावून बसले (उत्पत्ती ३). इस्राएल लोकांची पापे किती भयंकर होती हे यशया संदेष्ट्याने त्यांना सांगितले.

''पाहा, उद्धार करवत नाही इतका परमेश्वराचा हात तोकडा झाला नाही; ऐकू येत नाही इतका त्याचा कान मंद झाला नाही तर तुमचे अपराध तुम्ही व तुमचा देव ह्यांच्यामध्ये आड भिंतीप्रमाणे झाले आहेत; तुमच्या पातकांमुळे तो तुम्हास दर्शन देत नाही, तुमचे ऐकत नाही'' (यशया ५९:१,२).

देव पवित्र आहे, म्हणून तो पापाला मान्यता देत नाही, किंवा पापासोबत सहभागिता ठेवत नाही. त्याने पापाला शिक्षा दिलीच पाहिजे ही वस्तुस्थिती आहे. ''पापाचे वेतन

मरण आहे'' (रोम ६:२३).

आपल्या मृत्यूसमयी पापाचा दोष जर आपल्यावर असेल तर आपले काय होईल? आपला नाश होईल. असा एक दिवस येत आहे ज्या दिवशी येशू....

''कारण अनीतीचे रहस्य आताच आपले कार्य चालवत आहे, परंतु जो आता प्रतिबंध करत आहे तो मधून काढला जाईपर्यंत प्रतिबंध करत राहील; मग तो अनीतिमान पुरुष प्रकट होईल, त्याला प्रभू येशू आपल्या मुखातील श्वासाने मारून टाकील आणि तो येताच आपल्या दर्शनाने त्याला नष्ट करील; ज्यांचा नाश होत चालला आहे त्यांनी आपले तारण साधावे म्हणून सत्याची आवड धरायची ती धरली नाही...'' (२ थेस्सल १:७-९).

आपण प्रत्येकाने पाप केले आहे. देवासोबतची सहभागिता आपण सर्वजण गमावून बसलो आहोत. आपण सर्वजण मृत्यूला, आत्मिक मृत्यूला-देव आणि त्याचे सर्व चांगले आशीर्वाद यापासून विभक्त होणे-पात्र आहोत. आपल्या पापांमुळे आपण ही शिक्षा मिळवली आहे. आपल्याला नक्कीच सर्वकाळ त्रास सहन करण्याची इच्छा नाही, पण आपण त्याला पात्र आहोत.

पण,ज्या अतिपवित्र देवाला आपण दुखावले आहे, त्याची इच्छा नाही की,आम्हाला त्याच्या सहवासापासून कामयचे दूर करावे. असे असले तरी,तो पवित्र आणि न्यायी असल्यामुळे पापाला शिक्षा देणे त्याला भाग आहे.आम्हाला आमच्या पापांपासून मुक्त करण्याचा मार्ग आहे हे त्याने निश्‍चित केले.त्याने येशूला आमची पापे स्वत:वर घेऊन शिक्षा घेऊ दिली.

''खरे पाहिले असता तो आमच्या अपराधांमुळे घायाळ झाला, आमच्या दुष्कर्मामुळे ठेचला गेला; आम्हास शांती देणारी अशी शिक्षा त्यास झाली; त्यास बसलेल्या फटक्यांनी आम्हास आरोग्य प्राप्त झाले...ह्यामुळे मी त्याला थोरांबरोबर विभाग देईन, तो बलवानांबरोबर लूट

वाटून घेईल; कारण आपला प्राण वाहू देऊन तो मृत्यू पावला, त्याने आपणास अपराध्यात गणू दिले; त्याने बहुतांचे पाप आपल्यावर घेतले व अपराध्यांसाठी मध्यस्थी केली'' (यशया ५३ : ५,१२).

अपराध आणि दुष्कर्म हे पापाचे समानार्थी शब्द आहेत.

''कारण पापाचे वेतन मरण आहे. पण देवाचे कृपादान आपल्या प्रभू येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे'' (रोम ६:२३). येशू हा त्रैक्याचा भाग असल्याने, रोम ३:२६ मधील 'देव न्यायी आणि येशूवर विश्वास ठेवणाऱ्यांना नीतीमान ठरवणारा आहे' या पौलाच्या म्हणण्याचा अर्थ आपल्याला समजतो. २ थेस्सल १:७-९ ही वचने पुन्हा वाचा. तुम्ही देवाला ओळखता का? जर नाही, तर तुम्ही अजूनही तुमच्या पापातच आहात. येशूच्या द्वारे तुमचे तारण कसे होऊ शकते हे पुढच्या पाठात तुम्हाला समजेल.

● ● ●

*पाठ चार*

**SEEKERS**


# पापापासून तारण
# SALVATION FROM SIN

आपण सर्वांनी पाप केले आहे (रोम ३:२३), आणि आपण सर्वजण मरणाला पात्र आहोत (रोम ६:२३). ‘‘ ‘‘कारण पापाचे वेतन मरण आहे. पण देवाचे कृपादान आपल्या प्रभू येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे.’’ देव खरोखर दयाळू असल्यामुळे तो प्रत्येक देशातील प्रत्येक व्यक्तीला तारण देऊ करतो. कारण सर्व माणसांना तारण देणारी देवाची कृपा प्रगट झाली आहे....’’ (तीत २:११). आम्ही बंडखोर आणि पापी असताना सुद्धा देव आम्हाला तारणाची संधी देऊन त्याच्या प्रीतीची सखोलता दाखवतो. ‘‘परंतु देव आपल्यावरच्या स्वतःच्या प्रीतीचे प्रमाण हे देतो की, आपण पापी असतानाच ख्रिस्त आपल्यासाठी मरण पावला’’ (रोम ५:८).

देव आमच्या पापांपासून आमचे रक्षण कसे करतो? आमच्या पापाची शिक्षा त्याने येशूला स्वतःवर घेऊ देऊन आमचे तारण केले. आपण सर्वजण पापी असल्यामुळे, आपण एकमेकांची जागा घेऊ शकत नाही. केवळ निष्कलंक असणारी व्यक्तीच आमची जागा घेऊ शकते. ‘‘त्याने (येशूने) पाप केले नाही, आणि त्याच्या मुखात कपट आढळले नाही’’ (१ पेत्र २:२२). म्हणून आमची जागा घेण्यास तो पात्र ठरला.

आमचे तारण होण्यासाठी देवाने जी किंमत निश्चित केली होती, ती म्हणजे निष्कलंक अर्पणाचे रक्त. ‘‘रक्त ओतल्यावाचून पापक्षमा होत नाही’’ (इब्री ९:२२). येशूच्या ठायी कोणताही पापदोष नव्हता तरी दुष्ट व पापी लोकांकडून त्याला लाकडी वधस्तंभावर

खिळण्यात आले. कित्येक तास त्याने प्रचंड दु:ख सहन केले. तो मरण पावल्यावर एका सैनिकाने त्याच्या कुशीत भाला भोसकला, तेव्हा रक्त व पाणी बाहेर आले (योहान १९:२४). हे रक्त आमच्या पापांसाठी अर्पिले गेले (इब्री ९:१२). या रक्ताने येशूने आमची पापे धुतली (प्रकटी १:५). येशूच्या रक्ताशिवाय दुसऱ्या कशानेही आम्ही शुद्ध होऊ शकत नाही किंवा आमची पापे दूर होऊ शकत नाहीत.



येशूच्या रक्ताने आमची पापे जर धुतली गेली नाहीत, जर देवापासून आणि त्याच्या सर्व चांगुलपणापासून कायमचे विभक्त होण्याची शिक्षा आपल्याला मिळेल (२ थेस्सल १:९).

आमच्या पापांसाठी स्वत: शिक्षा भोगणे आणि आपल्या रक्ताने आमची पापे धुणे यापेक्षा मोठी प्रीती येशू कशी काय दाखवू शकला असता? पण तुमची पापे दूर करून तुम्हाला सार्वकालिक जीवन कसे मिळू शकते हा प्रश्न शिल्लक राहतो.

## तारणामधील मानवाची भूमिका

तारण जरी देवाच्या कृपेने मिळते आणि ते सर्वांसाठी उपलब्ध असले तरी, माणसाने यात स्वत: प्रतिसाद देण्याची गरज असते; अन्यथा माणसांचा दृष्टिकोन कसाही असता, त्यांनी काहीही केले असते तरी सर्व लोकांचे तारण झाले नसते.

येशू प्रत्येकाच्या पापासाठी संपूर्ण जगातील प्रत्येक माणसाच्या प्रत्येक पापासाठी मरण पावला (१ योहान १:२), पण सर्वांचेच तारण होईल असे नाही, कारण देवाचे हे कृपादान स्वीकारण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अटींची पुष्कळजण पूर्तता

करणार नाहीत. तारण मिळविण्यासाठी आपण देवाच्या अटींची पूर्तता केली पाहिजे. त्या अटी पुढे सांगितल्या आहेत.

**सर्वप्रथम, देव आहे यावर आपण विश्वास ठेवला पाहिजे.**

''आणि विश्वासावाचून त्याला संतोषवणे अशक्य आहे; कारण देवाजवळ जाणाऱ्याने असा विश्वास ठेवला पाहिजे की, तो आहे आणि त्याचा शोध झटून करणाऱ्यांना तो प्रतिफळ देणारा आहे'' (इब्री ११:५६).

**येशू त्याचा पुत्र आहे, आम्हाला आमच्या पापापासून सोडवण्यासाठी त्याने (देवाने) त्याला पाठवले असा देखील विश्वास आपण ठेवला पाहिजे.**

''म्हणून मी तुम्हाला सांगितले की, तुम्ही आपल्या पापात मराल; कारण मी तो आहे असा विश्वास तुम्ही न धरल्यास तुम्ही आपल्या पापात मराल'' (योहान ८:२४).

दुसरी पायरी म्हणजे आपल्या पापांचा पश्चात्ताप करणे. आपण पश्चात्ताप केला नाही, तर आपलाही नाश होईल हे येशूने स्पष्ट केले (लूक १३:३). ''पश्चात्ताप'' या शब्दाचा अर्थ काय? या शब्दाच्या व्याख्येचे अनेक भाग आहेत. प्रथम पाप म्हणजे काय? हे आपण समजून घेतले पाहिजे (पाठ ३ पाहा). त्यानंतर, पाप आपल्याला काय करते हे आपण समजून घेतले पाहिजे. ते आपल्याला देवाच्या सहभागितेपासून तोडते, विभक्त करते आणि सार्वकालिक शिक्षेसाठी पात्र करते. पापाने निष्कलंक येशूलादेखील वधस्तंभावर मरावे लागले; आमच्या पापांसाठी त्याने आपले रक्त सांडले.

या सत्यांवर विचार केल्यावर, आपण जे केले त्याविषयी आपल्याला वाईट वाटले पाहिजे. दुःखाची ही भावना म्हणजे पश्चात्ताप नाही, पण ते पश्चात्तापाला कारणीभूत ठरू शकते.

*''कारण ईश्वरप्रेरित दुःख तारणदायी पश्चात्तापास कारणीभूत होते, त्याबद्दल वाईट वाटत नाही;*

*पण ऐहिक दु:ख मरणास कारणीभूत होते'' (२ करिंथ ७:१०).*

**आपल्या पापांविषयी वाटणारे खरेखुरे दु:ख आपली विचारसरणी आणि कृती बदलण्यास कारणीभूत होते.** येशूसाठी मार्ग तयार करणाऱ्या योहानाने ''पश्चात्तापास योग्य फळ द्या'' असे सांगितले (लूक ३:८) दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे आपल्या जीवनशैलीत बदल झाला पाहिजे.

*''अज्ञानाच्या काळांकडे देवाने डोळेझाक केली, परंतु आता सर्वांनी सर्वत्र पश्चात्ताप करावा अशी तो माणसांना आज्ञा करतो. त्याने असा एक दिवस नेमला आहे की, ज्या दिवशी तो आपण नेमलेल्या मनुष्याच्याद्वारे जगाचा न्यायनिवाडा नीतिमत्त्वाने करणार आहे; त्याने त्याला मेलेल्यांतून उठवून ह्याविषयीचे प्रमाण सर्वांस पटवले आहे'' (प्रे.कृ.१७:३०-३१).*

*''कारण सर्व माणसांना तारण देणारी देवाची कृपा प्रकट झाली आहे; तो आपल्याला असे शिकवतो की, धन्य आशा प्राप्तीची म्हणजे आपला थोर देव व तारणारा असा जो येशू ख्रिस्त त्याचे गौरव प्रकट होण्याची वाट पाहत आपण अभक्तीला व ऐहिक वासनांना नाकारून सांप्रतच्या युगात मर्यादेने, नीतीने व सुभक्तीने वागावे'' (तीत २:११-१३).*

आपली जीवनशैली जर आपण बदलायला तयार असू (आपल्या इच्छेऐवजी देवाच्या इच्छेनुसार

---



*कारण तुमच्यामधील जितक्यांचा ख्रिस्तामध्ये बाप्तिस्मा झाला आहे तितक्यांनी ख्रिस्ताला परिधान केले आहे* गलती.३:२७

वागणे), तर येशू हा देवाचा पुत्र आहे हे लोकांसमोर कबूल करण्यास आपण तयार असले पाहिजे (मत्तय १०:३२,३३; प्रे.कृ. ८:३७,१ तीमथ्य ६:१२). विश्वास आणि येशूविषयी कबुली देणे यांची सांगड पुढील परिच्छेदात घातली आहे.

*''येशू प्रभू आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठवले असा आपल्या अंत:करणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल; कारण जो अंत:करणाने विश्वास ठेवतो तो नीतिमान ठरतो व जो मुखाने कबूल करतो त्याचे तारण होते'' (रोम १०:९,१०).*

**व्यक्तींची पापे काढून टाकण्यासाठी अखेरची पायरी म्हणजे त्यांना पापक्षमा मिळावी म्हणून बाप्तिस्मा घेणे.** विश्वास आणि बाप्तिस्मा यांची सांगड मार्क १६:१६ मध्ये घातली आहे. तेथे येशूने म्हटले,

*''जो विश्वास धरतो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल; जो विश्वास धरत नाही तो शिक्षेस पात्र ठरेल.''*

व्यक्ती जेव्हा विश्वास ठेवते आणि बाप्तिस्मा घेते तेव्हा तिचे तारण होते हे लक्षात घ्या. दोन्हीपैकी एखादी गोष्ट केली तर चालेल असे नाही, तर पापे धुतली जाण्यापूर्वी दोन्ही गोष्टी करणे आवश्यक आहे.

संपूर्ण जगात सुवार्ता गाजवली जात असताना लोकांचे तारण झाल्याचे पुष्कळ वृत्तांत प्रेषितांच्या कृत्यांमध्ये सांगितले आहेत. पहिला सुवार्तासंदेश, येशू ख्रिस्त स्वर्गात गेल्यावर (प्रे.कृ. १:९-११), आणि प्रेषितांवर पवित्र आत्मा आल्यावर (प्रे.कृ.२:१-४), पेन्टेकॉस्टच्या दिवशी गाजवला गेला.

आपण येशूला (देवाचा पुत्र) वधस्तंभावर खिळले याची खात्री पुष्कळ लोकांना पेत्राचा संदेश ऐकल्यावर झाली आणि पापक्षमा मिळावी म्हणून काय केले पाहिजे असा आक्रोश त्यांनी केला (प्रे.कृ.२:३६-३७).

*''पेत्र त्यांना म्हणाला, पश्चात्ताप करा व तुमच्या पापांची क्षमा व्हावी*

*म्हणून तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या; म्हणजे तुम्हाला पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल'' (प्रे.कृ. २:३८).*

*''तेव्हा ज्यांनी त्याच्या संदेशाचा स्वीकार केला त्यांचा बाप्तिस्मा झाला; आणि त्या दिवशी त्यांच्यात सुमारे तीन हजार माणसांची भर पडली'' (प्रे.कृ. २:४१).*

येशू हा ख्रिस्त, देवाचा पुत्र आहे याची खात्री लोकांना पेत्राचा संदेश ऐकून झाली. या वस्तुस्थितीवर त्यांनी विश्वास ठेवल्यामुळे आता पुढे काय करायचे हे त्यांना समजून घ्यायचे होते. त्यांना पापक्षमा मिळावी म्हणून पेत्राने त्यांना पश्चात्ताप करायला व बाप्तिस्मा घ्यायला सांगितले.

पापाच्या समस्येवरील उपाय आजही तोच आहे. ज्या कोणाला पापाची क्षमा हवी असेल त्याने/तिने पश्चात्ताप केला पाहिजे आणि बाप्तिस्मा घेतला पाहिजे.

पाणी आपल्याला शुद्ध करीत नाही. येशू त्याच्या स्वतःच्या रक्ताने आमची पापे धुतो (प्रकटी. १:५). आपण बाप्तिस्मा घेतो तेव्हा तो ती धुऊन दूर करतो (प्रे.कृ. २२:१६).

तोपर्यंत तो का थांबतो? या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर आपल्याला ५ व्या पाठात मिळेल पण त्याचे एक कारण म्हणजे येशूने आपल्याला तशी आज्ञा दिली आहे; तुम्ही मनापासून / आनंदाने ती पाळाल का?

*''त्याच्या लाक्षणिक अर्थाने आता बाप्तिस्मा येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाच्याद्वारे तुमचे तारण करत आहे. त्याचा अर्थ केवळ देहाचा मळ धुऊन टाकणे नव्हे, तर शुद्ध भावाने देवाचे ऐकणे, असा आहे'' (१ पेत्र ३:२१).*

• • •

## पवित्र शास्त्रानुसार तुमचा बाप्तिस्मा झाला आहे का?

बालपणी पाणी शिंपडून तुमचा बाप्तिस्मा झाला का असे आम्ही विचारीत नाही हे लक्षात घ्या. अशा प्रकारे बालपणी पाणी शिंपडून पुष्कळ लोकांचा बाप्तिस्मा झाला आहे. पण पाणी शिंपडणे हा पवित्र शास्त्रीय बाप्तिस्मा नाही. बाप्तिस्म्याऐवजी पाणी शिंपडण्याची प्रथा तिसऱ्या शतकात सुरू झाली आणि ती केवळ मानवी परंपरांवर आधारित आहे (मत्तय १५:९). पाणी शिंपडून बाप्तिस्मा झालेल्या पहिल्याच व्यक्तीचे नाव नोव्हाशियन होते. इ.स. २५०मध्ये ही घटना घडली.

आमचा प्रश्न असा आहे, ख्रिस्ताने ज्या बाप्तिस्म्याची आज्ञा दिली, तसा तुमचा बाप्तिस्मा झाला आहे का? नवीन करारात आपण ज्या बाप्तिस्म्याविषयी वाचतो तसा तुमचा बाप्तिस्मा झाला आहे का? (रोम ६:३-४).

दुसरी गोष्ट म्हणजे योग्य कारणासाठी तुमचा बाप्तिस्मा झाला आहे का? काही पंथांमध्ये पुष्कळ लोकांचा बुडून बाप्तिस्मा झाला आहे, पण तो चुकीच्या कारणाने. काहीजण म्हणतात, बाप्तिस्मा हे अंतरात्म्यात मिळालेल्या कृपेचे बाह्य चिन्ह आहे. ज्यांचा या सिद्धांतावर विश्वास आहे, ते असा दावा करतात की, अगोदर आमचे तारण झाल्यावर आम्ही बाप्तिस्मा घेतला. ही शिकवण येशू ख्रिस्ताच्या आणि त्याच्या प्रेषितांच्या साध्यासरळ विधानाला विरोध करतात (मार्क १६:१५, प्रे.कृ. २:२८, गलती ३:२७).

जर तुम्हाला योग्य तेच करायचे असेल, आणि पवित्र शास्त्रात सांगितल्यानुसार बाप्तिस्मा घ्यायचा असेल, तर आम्हाला शक्य त्या प्रकारे तुम्हाला मदत करण्यास आम्हाला आनंद होईल. तुम्ही आमच्या पत्त्यावर आम्हाला पत्र लिहू शकता किंवा फोन करू शकता.

*पाठ पाच*

**SEEKERS**

# पाण्यातील बाप्तिस्मा
# WATER BAPTISM

आपण सर्वजण जरी तारणास पात्र नाही, तरी आम्हा सर्वांचे तारण व्हावे ही देवाची इच्छा आहे (२ पेत्र ३:९). तारण मिळवण्यासाठी आपल्यापैकी कोणीही पुरेशी सत्कृत्ये करू शकत नाही, पण पापक्षमा मिळवण्यासाठी देवाने निश्चित केलेल्या अटींची पूर्तता आपण केली पाहिजे.

यामध्ये त्याच्यावरील **विश्वास,** आपल्या पापांचा **पश्चात्ताप,** येशू हा देवाचा पुत्र आहे हे **कबूल करणे,** आणि **बाप्तिस्म्यामध्ये ख्रिस्ताबरोबर पुरले जाणे** यांचा समावेश होतो. त्या क्षणी येशूचे रक्त आपली सर्व पापे धुऊन टाकते.

पुष्कळ धार्मिक गट, पंथ इतर सर्व अटींशी सहमत होतील (विश्वास, पश्चात्ताप, कबुली) पण बाप्तिस्म्याचा तारणाशी संबंध आहे हे पुष्कळजण नाकारतील. तारणासाठी बाप्तिस्मा आवश्यक आहे, तसेच का आवश्यक आहे हे हा पाठ स्पष्ट करील.

तारण ही देवाचे वचन ऐकण्यापासून सुरू होणारी प्रक्रिया आहे आतापर्यंत तुमच्या लक्षात आले असेल. देवाचे वचन ऐकण्याद्वारे विश्वास उत्पन्न होतो. पण कोणत्या क्षणी मनुष्य त्याच्या पापांपासून शुद्ध होतो? काहीजण असे शिकवतात की, मनुष्य ज्या क्षणी विश्वास ठेवतो, त्या क्षणी देव त्याचे तारण करतो; काही जणांना असे वाटते की, पश्चात्ताप केल्यावर किंवा येशूचे देवत्व कबूल केल्यावर तारण मिळते. लोक (चांगले आणि प्रामाणिक लोकदेखील) काय म्हणतात ते महत्त्वाचे नाही. पवित्र शास्त्र काय शिकवते ?

पापक्षमा मिळावी म्हणून बाप्तिस्मा घ्या असे पेत्राने लोकांना शिकवल्याचे आपण चौथ्या पाठात

पाहिले. बाप्तिस्म्याच्या कृतीमध्ये तारणाची प्रक्रिया पूर्ण होते (प्रारंभिक).

मंडळीचा छळ करणाऱ्या शौलाचा (जो नंतर प्रेषित पौल झाला). विचार करा. यरूशलेममधील ख्रिस्ती विश्वासणाऱ्यांचा छळ केल्यावर, तो दिमिष्कात गोंधळ घालायला निघाला होता. वाटेत त्याच्यावर आघात होऊन तो आंधळा झाला, आणि स्वर्गातून येशू त्याच्याशी बोलला. तेव्हा त्याच्या लक्षात आले की ज्या येशूचा मी छळ करतो तो देवाचा पुत्र आहे (प्रे.कृ.९:४-६). **पण अजून त्याचे तारण झाले होते का?**

शौल इतका पश्चात्तापी झाला की, तीन दिवस त्याने काही खाल्ले नाही, किंवा काही प्याला नाही (प्रे.कृ. ९:९). या कोणत्याही गोष्टीमुळे पापापासून त्याचे तारण झाले का? नाही. हनन्या त्याच्याकडे आला तेव्हाही त्याची पापे त्याच्यामध्येच होती. उपास आणि प्रार्थना करून आणि केलेल्या कृत्यांबद्दल दु:ख वाटल्यामुळे जर एखाद्याचे तारण होत असते, तर शौलाचे तारण झाले असते.

पण हनन्या त्याच्याशी पुढील



शब्द बोलला,' *''तर आता उशीर का करतोस ? ऊठ, त्याच्या नावाचा धावा करून बाप्तिस्मा घे आणि आपल्या* **पातकांचे क्षालन कर**''(प्रे.कृ. २२:१६).

केवळ बाप्तिस्मा झाल्यानंतरच शौलाची पापे धुतली जाणार होती. अशा प्रकारे तारणाची प्रक्रिया पूर्ण होणार होती.

येशूने या प्रक्रियेची तुलना शारीरिक जन्माशी केली. बालकाचा मातेच्या उदरात संभव होतो, तेव्हा वाढण्यासाठी, विकसित होण्यासाठी, आणि जन्मल्यानंतर जगण्यास सक्षम होण्यासाठी बालकाला वेळेची गरज असते. जन्म झाल्यावर त्या बालकाला जीवनातील महत्त्वाच्या गोष्टी शिकवल्या जातात.

देवाचे वचन (लूक ८:११ मध्ये याला ''बी'' म्हटले आहे.) एखाद्या व्यक्तीच्या अंत:करणात पेरले जाते तेव्हा ते समजण्यासाठी आणि त्याचे पालन करण्याचा निर्णय घेण्यासाठी त्याला /तिला वेळ लागतो. जेव्हा व्यक्तीचा बाप्तिस्मा होतो तेव्हा त्याचा /तिचा **नवीन जन्म** (आध्यत्मिक जन्म) होतो. येशूने या गोष्टी निकदेम नावाच्या मनुष्याला शिकवल्या. येशूने त्याला म्हटले, *''मी तुम्हाला खचीत सांगतो, पाण्यापासून व आत्म्यापासून जन्म घेतल्यावाचून कोणीही देवाच्या राज्यात प्रवेश करू शकत नाही''* (योहान ३:५).

बाप्तिस्मा ही नवीन जन्माच्या प्रक्रियेतील अखेरची पायरी आहे. फिलिप्पै येथील तुरूंगाधिकाऱ्याला मध्यरात्रीनंतर देवाचे वचन शिकवण्यात आले होते (प्रे.कृ. १६:२५). तारण व्हावे म्हणून काय करोव असे त्याने विचारले तेव्हा शौलाने (जो आता प्रेषित पौल म्हणून ओळखला जात होता) त्याला उत्तर दिले,

*''प्रभू येशूवर विश्वास ठेव म्हणजे तुझे व तुझ्या घराण्याचे तारण होईल. त्यांनी त्याला व त्याच्या घरातील सर्वांना प्रभूचे वचन सांगितले. मग रात्रीच्या त्याच घटकेस त्याने त्यांना जवळ घेऊन त्यांच्या जखमा धुतल्या;*

*आणि तेव्हाच त्याने व त्याच्या घरच्या सर्व माणसांनी बाप्तिस्मा घेतला. मग त्याने त्यांना घरी नेऊन जेवू घातले आणि देवावर विश्वास ठेवून सर्व मंडळीने आनंदोत्सव केला''* (प्रे.कृ. १६:३१-३४).

देवाचे वचन ऐकणे इतके महत्त्वाचे होते की, पौलाचे बोलणे ऐकण्यासाठी तुरूंगाधिकाऱ्याने आपल्या कुटुंबियांना उठवले हे लक्षात घ्या. पौलाने या लोकांना दिलेल्या संदेशात बाप्तिस्म्याचाही समावेश असावा. तसेच तारणासाठी बाप्तिस्मा आवश्यक आहे हे ही त्यांना समजले असावे, नाहीतर अशा अवेळी त्यांनी बाप्तिस्मा घेतला नसता. *''देवावर विश्वास ठेवून त्याने व त्याच्या घरच्या सर्व मंडळीने आनंदोत्सव केला''* हे लक्षात घ्या.

आता आपण हबशी षंढाचा विचार करू या.

*''तेव्हा फिलिप्पाने बोलण्यास आरंभ केला व ह्या शास्त्रलेखापासून सुरवात करून येशूविषयीची सुवार्ता त्याला सांगितली. मग वाटेने जात असता ते पाणवठ्याजवळ आले, तेव्हा षंढ म्हणाला, पाहा हे पाणी; मला बाप्तिस्मा घेण्यास काय हरकत आहे?''* (प्रे.कृ. ८:३५, ३६).

लक्षात घ्या. येशूविषयी जर योग्य प्रकारे शिकविले, तर बाप्तिस्म्याविषयी शिकवले जाते. ख्रिस्त गाजवणे म्हणजे एखाद्या व्यक्तीला त्याच्या/तिच्या पापांची क्षमा कशी होईल हे सांगणे असेल - **ज्यात पापांच्या क्षमेसाठी बाप्तिस्म्याचा समावेश आहे** - तर येशूची शिकवण देत असताना बाप्तिस्मा घेण्यासाठी कारण शोधण्याची गरज उरत नाही.

ही गोष्ट पवित्र शास्त्रालाच अधिक स्पष्ट करू द्या. जे सुवार्तेचे पालन करीत नाहीत, त्यांचा नाश होईल हे आपल्याला माहीत आहे (२ थेस्सल १:८). *पण सुवार्तेचे पालन करणे म्हणजे काय?* जर सुवार्ता म्हणजे ख्रिस्ताचे आमच्या पापांसाठी वधस्तंभावर मरण, त्याचे पुरले जाणे, आणि त्याचे पुनरूत्थान (१ करिंथ

१५:१-४) असेल, तर आपण त्याचे **पालन** कसे काय करणार? या संदेशाचा जो साचा आहे त्याचे आपण पालन करतो (रोम ६:१७,१८). आपण **पापाला मरतो, बाप्तिस्म्यामध्ये आपण येशूबरोबर पुरले जातो** आणि जीवनाच्या नाविन्यात वाटचाल करण्यासाठी उठवले जातो (रोम ६:३-७). अशा प्रकारे व्यक्ती बाप्तिस्म्यामध्ये सुवार्तेचे पालन करते.

पुष्कळ धार्मिक गट बाप्तिस्म्याऐवजी शिंपडण्याच्या पद्धतीचा अवलंब करतात, **पण पुरले जाण्यामध्ये व्यक्ती पूर्णपणे झाकली गेली पाहिजे.** बाप्तिस्मा घेऊ इच्छिणारा षंढ आठवतो का ? त्याचा बाप्तिस्मा कसा झाला ते पुढील वचनात सांगितले आहे.

*''तेव्हा त्याने रथ उभा करण्यास सांगितले आणि फिलिप्प व षंढ असे ते दोघे पाण्यात उतरले; आणि त्याने त्याला बाप्तिस्मा दिला. मग ते पाण्यातून वर आले तोच प्रभूचा आत्मा फिलिप्पाला घेऊन गेला म्हणून तो पुन्हा षंढाच्या दृष्टीस पडला नाही; नंतर तो आपल्या वाटेने हर्ष करत चालला''* (प्रे.कृ. ८:३८,३९).

याचा अर्थ, **ज्यांनी ख्रिस्तावर विश्वास ठेवला, आपल्या पापांचा पश्चात्ताप केला** आणि **येशू हा देवाचा पुत्र आहे असे कबूल केले,** केवळ त्यांच्यासाठीच **बाप्तिस्मा** आहे. तो **बुडवून** (पाण्याखाली पूर्णपेण बुडवले जाऊन) आणि **पापांच्या क्षमेसाठी** आहे. नवीन जन्माची ती शेवटची पायरी आहे. ज्या कोणाचा बाप्तिस्मा पापांच्या क्षमेसाठी झालेला नाही, त्यांनी तारणाच्या प्रक्रियेतील या भागाविषयी गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे.

● ● ●

*पाठ सहा*

**SEEKERS**

# मंडळी

# THE CHURCH

पापांची क्षमा मिळावी म्हणून मनुष्याचा बाप्तिस्मा होतो,तेव्हा प्रभू येशूच्या नावात तो धुतला जातो, पवित्र केला जातो आणि नीतीमान केला जातो (१ करिंथ ६:११). त्या मनुष्याने केलेले प्रत्येक पाप येशूच्या रक्ताने धुतले जाते (प्रकटी १:५). तसेच त्याचा विश्वास आणि सुवार्तेचे त्याने केलेले पालन यामुळे तो देवाचे लेकरू बनतो.

*''कारण तुम्ही सर्व ख्रिस्त येशूवरील विश्वासाच्याद्वारे देवाचे पुत्र आहात. कारण तुमच्यामधील जितक्यांचा ख्रिस्तामध्ये बाप्तिस्मा झाला आहे तितक्यांनी ख्रिस्ताला परिधान केले आहे''* (गलती ३:२६,२७).

ख्रिस्ती व्यक्ती ही *''नवी उत्पत्ती आहे, जुने ते होऊन गेले; पाहा, ते नवे झाले आहे''* (२ करिंथ ५:१७). लक्षात ठेवा, ख्रिस्ती मनुष्य पापाला मेला आहे (जुन्या गोष्टी निघून गेल्या); पापी मनुष्य मरून पुन्हा जन्मला आहे (योहान ३:१-७).


*''तर मग आपण त्या मरणातील बाप्तिस्म्याने त्याच्याबरोबर पुरले गेलो; ह्यासाठी की, ज्याप्रमाणे ख्रिस्त पित्याच्या गौरवाने मेलेल्यांतून उठला त्याचप्रमाणे आपणही नवीन प्रकारच्या जीवनात चालावे''* (रोम ६:४).

याप्रसंगी नेहमी विचारला जाणारा प्रश्न म्हणजे, ''आता मी पाप केले तर काय होईल? मला पुन्हा बाप्तिस्मा घ्यावा लागेल काय?'' या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, संबंधित व्यक्तीने केलेल्या पापाचा **पश्चात्ताप करून** ते देवाकडे कबूल केले पाहिजे. ''तो (देव) विश्वसनीय व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील, व आपल्याला सर्व अनीतीपासून शुद्ध करील'' (१ योहान १:९). सर्व

बाबतीत देवाचे अधिकाधिक आज्ञापालन करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे.

*''पण जसा तो प्रकाशात आहे तसे जर आपण प्रकाशात चालत असलो तर आपली एकमेकांबरोबर सहभागिता आहे, आणि त्याचा पुत्र येशू ह्याचे रक्त आपल्याला सर्व पापांपासून शुद्ध करते''* (१ योहान १:७).

दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे, एकदा का आपण येशूच्या रक्ताच्या संपर्कात आलो (बाप्तिस्म्यामध्ये), की आपण देवाला संतुष्ट करण्याचा जसजसा प्रयत्न करतो, तसतसे ते आपल्याला शुद्ध



करीत राहते.

दुसरा आशीर्वाद म्हणजे तारण पावलेल्या व्यक्तीची देव मंडळीत भर घालतो (प्रे.कृ. २:४७).

मंडळी म्हणजे काय? ही मनुष्याने निर्माण केलेली संस्था नाही. पवित्र शास्त्र तिला ख्रिस्ताचे शरीर म्हणून दर्शवते. उद्धार पावलेल्या या लोकांची खरेदीची किंमत भरण्यासाठी येशू मरण पावला; *''त्याने आपल्या रक्ताने ती स्वतःकरिता मिळवली''* (प्रे.कृ. २०:२८). त्याच्या दृष्टीने ती इतकी मोलवान आहे की तो तिची काळजी घेतो, तिचे संगोपन करतो (इफिस ५:२९).

मंडळी आणि येशूसोबतचे तिचे नातेसंबंध याची चर्चा इफिसकरांस पत्र करते. पौल लिहितो की, *''त्याने सर्व काही त्याच्या पायाखाली ठेवले, आणि त्याने सर्वांवर मस्तक असे व्हावे म्हणून त्यास मंडळीला दिले; हीच त्याचे शरीर...''* (इफिस १:२२-२३). तसेच *''ख्रिस्त मंडळीचे मस्तक आहे,''* आणि *''ख्रिस्त हाच शरीराचा तारणारा आहे,''* असेही तो लिहितो.

त्यानंतर पौल ख्रिस्त आणि मंडळीविषयी अनेक गोष्टी सांगतो.

*''पतींनो, जशी ख्रिस्ताने मंडळीवर प्रीती केली तशी तुम्हीही आपआपल्या पत्नीवर प्रीती करा; ख्रिस्ताने मंडळीवर प्रीती केली आणि स्वतःस तिच्यासाठी समर्पण केले, अशासाठी की, तिला त्याने वचनाद्वारे जलस्नानाने स्वच्छ करून पवित्र करावे, आणि गौरवयुक्त मंडळी अशी ती स्वतःला सादर करावी, म्हणजे तिला डाग, सुरकुती किंवा अशासारखे काही नसून ती पवित्र व निर्दोष असावी''* (इफिस ५:२५-२७).

आमच्या पापांसाठी वधस्तंभावर मरण्याइतपत प्रीती त्याने आमच्यावर केली, एवढेच नाही, तर ख्रिस्ती विश्वासणारे म्हणून आम्ही वाढावे, परिपक्व व्हावे ही त्याची इच्छा आहे हे समजून घेणे सोपे आहे. तसेच मंडळ्या किती आहेत हेही समजून घेणे सोपे आहे. एक **मस्तक** आणि एक **शरीर** (मंडळी) आहे. हे सत्य पौल इफिस ४:४ मध्ये सांगतो. *''तुम्हाला झालेल्या पाचारणापासून निर्माण होणारी आशा जशी एकच आहे, तसे शरीरही एकच व आत्मा एकच आहे.''* हे वर्णन अगदी योग्य आहे, कारण मनुष्य या नात्याने आपणा प्रत्येकाला एक मस्तक आणि एक शरीर आहे.

येशू संपूर्ण मंडळीचा प्रमुख आहे. नवीन करारात मंडळी हा शब्द दोन अर्थांनी वापरला आहे. विश्वासणाऱ्यांच्या संपूर्ण समुहासाठी (इफिसकरांस पत्रात आपण पाहिल्याप्रमाणे) तो वापरला आहे; तसेच देवाच्या लोकांच्या स्थानिक समूहासाठी (पुष्कळ वेळा) देखील वापरला आहे, उदा. थेस्सलनीका येथील मंडळी (१ थेस्सल १:१). देवाच्या लोकांच्या सर्व स्थानिक मंडळ्या मिळून देवाची सार्वत्रिक मंडळी बनते, पण प्रत्येक भौगोलिक क्षेत्रात असलेली मंडळी ही ख्रिस्ताची मंडळी आहे.

किती प्रकारच्या मंडळ्या आहेत? पवित्र शास्त्र केवळ एक मंडळीविषयी सांगते. *''एकच शरीर''* (मंडळी) आहे असे इफिस ४:४ सांगते हे लक्षात ठेवा. पण आज, कुठल्याही

भागात तुम्हाला एकापेक्षा अधिक मंडळ्या दिसतील. त्यांची नावे वेगवेगळी असतील. हे धार्मिक गट पवित्र शास्त्रातून आलेले नाहीत. एखाद्या माणसाने (किंवा गटाने) त्या सुरू केल्या आहेत. ख्रिस्त केवळ एका शरीरावर (मंडळीवर) प्रमुख आहे. पौल लिहितो :

*''कारण आपण यहुदी असू किंवा हेल्लेणी असू, गुलाम असू किंवा स्वतंत्र असू. एक शरीर होण्यासाठी आपणा सर्वांना एका आत्म्यात बाप्तिस्मा मिळाला आहे आणि आपण सर्व एकाच आत्म्याने संचरित झालो आहोत''* (१ करिंथ १२:१३)

आपल्या पापांची क्षमा व्हावी म्हणून आपण बाप्तिस्मा घेतला आणि प्रभूने मंडळीत आपली भर घातली, आपण बरेचदा चुकीच्या कल्पना आणि रूढी घेऊन मंडळीत आलो. पण पवित्र शास्त्रात शिकवलेली सत्ये आपण शिकले पाहिजे, आणि ''... सर्वांचे बोलणे सारखे असावे; म्हणजे तुमच्यामध्ये फुटी पडू नयेत; तुम्ही एकचित्ताने व एकमताने जोडलेले व्हावे'' (१ करिंथ १:१०), हे आपले ध्येय असावे.

करिंथमधील विश्वासणारे जेव्हा स्वत:ची विभागणी वेगवेगळ्या गटांत करू लागले तेव्हा पौलाने त्यांना आत्मिक नव्हे, तर दैहिक म्हटले.

*''कारण जेव्हा एखादा म्हणतो, मी पौलाचा आहे; दुसरा म्हणतो, मी अपुल्लोसाचा आहे; तेव्हा तुम्ही मानवच आहात की नाही?''* (१ करिंथ ३:४).

ख्रिस्ताच्या रक्ताने तारण पावलेले सर्वजण एका शरीरात-त्याच्या शरीरात आहेत. येशूने ऐक्यासाठी प्रार्थना केली (योहान १७:२०-२१), आणि सर्व खऱ्या विश्वासणाऱ्यांना तेच हवे आहे. परस्परविरोधी दृष्टिकोन असणाऱ्या निरनिराळ्या आत्मिक शरीरात आपल्याला ठेवण्यात आलेले नाही; एक शरीर आणि एक मंडळी हे यहुदी आणि विदेशीसुद्धा (जे एकमेकांचा द्वेष करीत होते) आता एका शरीराचे अवयव आहेत. पुढील शास्त्रभाग पाहा :

''म्हणून आठवण करा की, तुम्ही पूर्वी देहाने परराष्ट्रीय आणि ज्यांची सुंता हाताने केलेली म्हणजे देहाची

आहे अशा स्वत:ला सुंती म्हणवणाऱ्या लोकांकडून बेसुंती म्हणवले जाणारे होता; ते तुम्ही त्या वेळेस ख्रिस्तविरहित, इस्राएलाच्या राष्ट्राबाहेरचे, वचनाच्या करारांना परके, आशाहीन व देवविरहित असे जगात होता;

*परंतु जे तुम्ही पूर्वी दूर होता ते तुम्ही आता ख्रिस्त येशूच्याठायी ख्रिस्ताच्या रक्ताच्यायोगे जवळचे झाला आहात. कारण तो आपली मूर्तिमंत शांती आहे; त्याने दोघांना एक केले आणि मधली आडभिंत पाडली''* (इफिस २:११-१४.).

आता सगळीकडचे सर्व लोक (श्रीमंत किंवा गरीब, काळे किंवा गोरे, पुरुष अथवा स्त्री) मंडळीत एक केले जाऊ शकतात (गलती ३:२७,२८). पौल पुढे सांगतो की, मंडळीचे रहस्य युगांपासून गुप्त ठेवण्यात आले होते, पण आता ते प्रगट करण्यात आले आहे (इफिस ३:१-७.).

ख्रिस्ताच्या मंडळीचे, जगाच्या स्थापनेपासून स्थापन करण्यात आलेल्या आध्यात्मिक राज्याचे भाग होणे किती सन्मानाचे आहे (इफिस १:४).

*''आपल्याला देवाची मुले हे नाव मिळाले ह्यात पित्याने आपल्याला केवढे प्रीतिदान दिले आहे पाहा''* (१ योहान ३:१)

त्या बदल्यात आपल्यावर पुष्कळ जबाबदाऱ्या आहेत.

पहिली गोष्ट म्हणजे, आपल्या पापांची क्षमा झाल्यावर, स्वत:ला शुद्ध ठेवण्यासाठी आपण शक्य ते सर्व केले पाहिजे (१ योहान ३:३). दुसरी गोष्ट म्हणजे, नवीन जन्म झाल्यावर आपण आध्यात्मिकरित्या वाढले पाहिजे (१ पेत्र २:२). हे करीत असताना आपल्या लक्षात येईल की,

*''त्याच्यापासून पुरवठा करणाऱ्या प्रत्येक सांध्याच्यायोगे, संबंध शरीराची जुळवणूक व जमाजमव होत असते, आणि प्रत्येक अंग आपआपल्या परिमाणाने कार्य करत असता आपली रचना प्रीतीमध्ये होण्यासाठी शरीर आपली वृद्धी करून घेते''* (इफिस ४:१६).

● ● ●

## काही पंथांची स्थापना

| नाव | संस्थापक | ठिकाण | तारीख |
|---|---|---|---|
| रोमन कॅथलिक | कॉन्स्टन्टाईन | रोम | ४ थे शतक |
| ल्युथरन मंडळी | मार्टिन ल्यूथर | रोम | १५३० |
| प्रेस्बिटेरियन मंडळी | जॉन कॅल्विन | स्वित्झर्लंड | १५३५ |
| अँग्लीकन मंडळी | राजा आठवा हेन्री | इंग्लंड | १५३५ |
| बॅप्टिस्ट मंडळी | जॉन स्मिथ | लंडन, इंग्लंड | १६०७ |
| मेथॉडिस्ट चर्च | जॉन वेस्ली | लंडन, इंग्लंड | १७२९ |
| इव्हँजेलिकल चर्च | जेबक अलब्राईट | पेनसिल्वानिया, यु.एस.ए. | १८०३ |
| मॉर्मन चर्च | जेकब स्मिथ, ज्यु. | न्युयॉर्क, यु.एस.ए. | १८३० |
| सेवन्थ डे ॲडव्हेन्टिस्ट | विलय्म मिलर आणि एलन जी. व्हाईट | मॅसेच्युसेट्स, यु.एस.ए. | १८३१ |
| न्यु ॲपोस्टोलिक चर्च | प्रुएस | हॅम्बर्ग, जर्मनी | १८६२ |
| जहोवाज विटनेसेस | चार्लस रसेल | पेनसिल्वानिया, यु.एस.ए. | १८७४ |
| पेन्टेकॉस्टल चर्च | ग्रुप | साऊथ कॅरोलिना, यु.एस.ए. | १८९८ |
| ॲग्लीपायन चर्च | ग्रेगरियो ॲग्लीपे | फिलिपाईन्स | १९०२ |
| इग्लेसिया नी क्रिस्टो १९१४ | फेलिक्स मेनालो | मनिला, फिलिपाईन्स | १९१४ |
| असेंब्ली ऑफ गॉड | ग्रुप | अर्कान्सास, यु.एस.ए. | १९१४ |
| युनायटेड चर्च ऑफ क्राईस्ट | सोब्रेना इन द फिलिपाईन्स | फिलीपाईन्स | १९४८ |

येशूने म्हटले, ''माझ्या स्वर्गातील पित्याने लावले नाही असे प्रत्येक रोप उपटले जाईल'' (मत्तय १५:१३).
स्तोत्रकर्त्याने म्हटले, ''परमेश्वर जर घर बांधत नाही तर ते बांधणाऱ्यांचे श्रम व्यर्थ आहेत'' (स्तोत्र १२७:१).

**SEEKERS**

# खरी उपासना
# TRUE WORSHIP

ख्रिस्ती विश्‍वासणारा देवाच्या खास सहभागितेचा आनंद घेत असतो/असते. बाप्तिस्म्याच्यां वेळी ख्रिस्ताचा शरीराचा भाग होण्याद्वारे प्रत्येक सभासद मोठ्या कुटुंबाचा-मंडळीचा सदस्य होतो.

ज्या प्रत्येकाने शुभवर्तमानाचे आज्ञापालन केले आहे तो प्रत्येक व्यक्ती त्या आध्यात्मिक कुटुंबाचा भाग बनतो ज्यासाठी ख्रिस्ताने मरण सहन केले. आपण एकटे असतो तेव्हाही आपण वैयक्तिकरित्या परमेश्‍वराची उपासना करू शकतो. आपल्या घरी कुटुंबासमवेत देखील आपण त्याची उपासना करू शकतो. आठवड्यातील कोणत्याही दिवशी आणि दिवसाच्या कोणत्याही वेळी आपण आपली उपकारस्तुती आणि प्रार्थना देवाला सादर करू शकतो. देवाकडे जाण्यासाठी एखाद्या पाळकांची, मान्यताप्राप्त किंवा दीक्षित व्यक्तीची गरज नाही. आपण कोठेही कधीही देवाची मोकळेपणाने उपासना करू शकतो.

परंतु मंडळीने एकत्र येऊन भक्ती करण्यासाठी देवाने आठवड्यातील पहिला दिवस (रविवार) वेगळा नियुक्त केलेला आहे. खरे तर जेव्हा ,३००० लोकांचा तारणासाठी एकाच दिवशी बाप्तिस्मा होऊन (प्रे.कृ. २:३८-४१) मंडळीमध्ये त्यांची वाढ झाली तेव्हाही आठवड्याचा पहिलाच दिवस होता (प्रे.कृ. २:४७).


त्या दिवसापासून म्हणजे दोन हजार वर्षांपूर्वीपासून ते आजपर्यंत ख्रिस्ती लोक देवाच्या उपासनेसाठी, आपल्या पापांपासून येशूने वधस्तंभावर सहन केलेल्या मरणाची आठवण करण्यासाठी, देवाच्या वचनाचा अभ्यास करण्यासाठी, प्रार्थना करण्यासाठी, पैशामधील किंवा वस्तुंमधील देवाचा हिस्सा देवाला

देण्यासाठी आणि त्याला स्तुतीगीते अर्पण करण्यासाठी एकत्र येत आहेत.

पुढे दिलेली वचने काळजीपूर्वक पाहा.

*''तर आता परमेश्‍वराचे भय धरा, त्याची सेवा सात्विकतेने व खऱ्या मनाने करा आणि महानदीपलीकडे व मिसर देशात ज्या देवांची तुमच्या पूर्वजांनी सेवा केली ते टाकून परमेश्‍वराची सेवा करा''* (यहोशवा २४:१४).

*''मात्र तुम्ही परमेश्‍वराचे भय धरा व सत्याने व जिवेभावे त्याची सेवा करा. त्याने तुमच्यासाठी केवढी महत्कृत्ये केली आहेत ह्याचा विचार करा''* (१ शमु. १२:२४).



*''तरी खरे उपासक आत्म्याने व खरेपणाने पित्याची उपासना करतील अशी वेळ येते आहे. किंबहुना आलीच आहे; कारण आपले उपासक असे असावेत अशीच पित्याची इच्छा आहे, देव आत्मा आहे; आणि त्याच्या उपासकांनी त्याची उपासना आत्म्याने व खरेपणाने केली पाहिजे''* (योहान ४:२३, २४).

*''आणि बोलणे किंवा करेण जे काही तुम्ही कराल, ते सर्व प्रभू येशूच्या नावाने करा; आणि त्याच्या द्वारे देव जो पिता त्याची उपकारस्तुती करा''* (कलस्सै ३:१७).

पाठाच्या सुरूवातीला दिलेली पवित्र शास्त्रातील पहिली तीन वचने एकमेकांशी मिळतीजुळती आहेत. या तीनही वचनांमध्ये सत्य हा शब्द आलेला आहे.

उपासना जर खरी असेल, तर ती सत्याला अनुसरून असावी. ज्या गोष्टी (आणि फक्त त्याच) ज्या देवाने आज्ञापिलेल्या आहेत त्याच गोष्टी आपण कराव्यात.

चौथ्या वचनावरूनही हेच स्पष्ट होते. जी काही आपण कृती करतो

(उपासना) आणि जे काही आपण बोलतो (शिकवतो) ते सर्व येशूच्या नावाने असावे, म्हणजेच त्याच्या अधिकारामध्ये व्हावे.

आपण जी देवाची उपासना करतो ती जर देवाला मान्य नाही तर ती खरी उपासना नाही. सर्वसाधारण उपासना देखील ''तुमच्या पूर्ण अंत:करणापासून'' किंवा ''मनाने'' किंवा ''आत्म्याने'' केलेली असावी. ज्या उपासनेमध्ये प्रीती नाही ती उपासना देवाला अर्पण करू शकत नाही. अशाने त्याचा अपमान होईल, कारण पूर्वी काहींनी देवाला अर्पण केले परंतु ते म्हणाले, *''काय पीडा ही!''* (मलाखी १:१३)

## प्रभूभोजन

पहिल्या शतकात मंडळीची स्थापना झाली तेव्हा शिष्य आठवड्याच्या पहिल्या दिवशी भाकर मोडण्यासाठी एकत्र येत असत (प्रे.कृ. २०:७; २:४२). या वाक्यप्रयोगाने प्रभूभोजनाचा बोध होतो. येशूने आमच्यासाठी वधस्तंभावर जे केले त्याचे स्मरण करण्याचा हा विधी आहे.

या विधीचा हेतू काय आहे याची आठवण पौलाने करिंथ येथील मंडळीला करून दिली. *''कारण जे मला प्रभूपासून मिळाले तेच मी तुम्हाला सांगितले आहे की, ज्या रात्री प्रभू येशूला धरून देण्यात आले त्या रात्री त्याने भाकर घेतली; आभार मानून ती मोडली, आणि म्हटले, हे माझे शरीर आहे, हे तुमच्यासाठी आहे. माझ्या स्मरणार्थ हे करा.''*

*''मग भोजन झाल्यावर त्याने प्याला घेऊन तसेच केले आणि म्हटले, हा प्याला माझ्या रक्ताने झालेला नवा करार आहे; जितक्यांदा तुम्ही हा पिता तितक्यांदा माझ्या स्मरणार्थ हे करा. कारण जितक्यांदा तुम्ही ही भाकर खाता व हा प्याला पिता तितक्यांदा तुम्ही प्रभूच्या मरणाची तो येईपर्यंत घोषणा करिता''* ( १ करिंथ ११:२३-२६).

या स्मरणविधीमध्ये वापरली जाणारी **बेखमीर भाकर** ही, आमच्या पापांसाठी वधस्तंभावर मरण पावलेल्या आपल्या तारणकर्त्याची दर्शक आहे. **द्राक्षरस** हे आमच्यासाठी ओतले गेलेल्या रक्ताचे प्रतीक आहे. दर आठवड्याच्या पहिल्या दिवशी आपण

येशूच्या बलिदानाचे स्मरण (प्रे.कृ. २०:७, १ करिंथ ११:२३-३३) करण्यासाठी त्याच्या मेजाजवळ एकत्र येतो.

### देणे

*''आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताची कृपा तुम्हाला माहीत आहे; तो धनवान असता तुमच्याकरिता दरिद्री झाला, अशा हेतूने की, त्याच्या दारिद्र्याने तुम्ही धनवान व्हावे''* (२ करिंथ ८:९).

*''संतोषाने देणारा''* देवाला आवडतो (२ करिंथ ९:७), आणि देवाने जे काही आपल्याला देऊन आशीर्वादीत केले आहे त्यापैकी काही त्याला परत देण्याचा हक्क ख्रिस्ती या नात्याने आपल्याला मिळालेला आहे. बंधुजनांची ज्या प्रमाणात उन्नती, भरभराट झाली असेल त्या प्रमाणात त्यांनी आठवड्याच्या पहिल्या दिवशी द्यावे अशी पौलाने आज्ञा केली (१करिंथ १६:१,२).

### प्रेषितांच्या सिद्धांततत्त्वांत टिकून राहणे

पेन्टेकॉस्टच्या दिवशी तीन हजार लोकांचा बाप्तिस्मा झाला तेव्हा आपल्या पापांची क्षमा झाली आहे हे त्यांना माहीत होते; पण नवीन राज्याची शिकवण शिकण्याची त्यांना गरज होती म्हणून, पवित्र आत्म्याने प्रेषितांना ज्या गोष्टी प्रगट केल्या होत्या, त्या त्यांनी त्यांना शिकवल्या (प्रे.कृ.२:४२). पवित्र आत्म्याच्या प्रेरणेनुसार त्यांनी बोललेले अथवा लिहिलेले शब्द सत्य होते, देवाचे वचन होते (१ थेस्सल २:१३). आपल्याला सत्य शिकवले जात आहे याची खात्री करून घेण्यासाठी आपण बिरूया येथील मंडळीप्रमाणे रोज पवित्र शास्त्रात शोधले पाहिजे (प्रे.कृ. १७:११). तसेच आध्यात्मिकरित्या वाढण्यासाठी आपण देवाच्या वचनाचा अभ्यास करण्याची गरज आहे (१ पेत्र २:२).

### प्रार्थना

''निरंतर प्रार्थना करा'' (१ थेस्सल ५:१७) असे पौल आपल्याला सांगतो. प्रत्येक विश्वासणाऱ्याने येशूद्वारे रोज पित्याकडे आले पाहिजे (तसेच आठवड्याच्या पहिल्या दिवशी बंधुजनांच्या सहभागितेतदेखील); आपल्या विचारांत आणि अंतःकरणता नेहमी देव असला पाहिजे. त्याची

महानता, त्याने कृपेने दिलेले तारण, तो आमच्यावर किती प्रीती करतो याविषयी त्याच्या वचनातून होणारे आकलन याविषयी आपण त्याचे उपकार मानावे तसेच आपण देवाकडे विनंत्यादेखील करू शकतो, पण त्या स्वार्थी हेतूने नसाव्यात (याकोब ४:३).

*''कशाविषयीही चिंताक्रांत होऊ नका, तर सर्व गोष्टींविषयी प्रार्थना व विनंती करून आभारप्रदर्शनासह आपली मागणी देवाला कळवा; म्हणजे सर्व बुद्धिसामर्थ्याच्या पलीकडे असलेली देवाने दिलेली शांती तुमची अंतःकरणे व तुमचे विचार ख्रिस्त येशूच्याठायी राखील''* (फिलिप्पै ४:६,७).

**गीत गाणे**

ख्रिस्ती विश्वासणाऱ्यांवर एकमेकांशी बोलण्याची देखील जबाबदारी असते.

*''ख्रिस्ताचे वचन तुमच्यामध्ये भरपूर राहो; परस्परांना सर्व ज्ञानाने शिकवण द्या व बोध करा; आपल्या अंतःकरणात देवाला स्तोत्रे, गीते व आध्यात्मिक गायने कृपेच्या प्रेरणेने गा''* (कलस्सै ३:१६).

देवाला आणि एकमेकांना स्तोत्रे, गीते गाण्याची अनुमती नवीन करार आपल्याला देतो; गाण्यासोबत वाद्यांची साथ करायला तो आपल्याला कधीही सांगत नाही. लक्षात ठेवा, **येशूने जे करायला आपल्याला सांगितले आहे, तेवढेच आपण करायचे आहे** (कलस्सै ३:१७). त्याने किंवा त्याच्या शिष्यांनी वाद्यांच्या साथीसह गाणी गायल्याचा वृत्तांत आपल्याला कोठेही आढळत नाही.

**यराबामाचे पाप**

देवाने ज्या प्रकारे उपासना करायला सांगितली होती, त्यात यराबाम नावाच्या मनुष्याने बदल केला (१ राजे १२:२५-३३). या निर्णयामुळे तो आणि त्याचे लोक मोठे पाप करण्यास प्रवृत्त झाले (२ राजे १७:२१). या उदाहरणावरून आपल्या लक्षात येते की, उपासनेची जी पद्धत देवाने सांगितली आहे तिच्यात आपण काही भर घालू नये, किंवा काही कमी करू नये. देवाने ज्या प्रकारे उपासना करायला सांगितले आहे, त्या प्रकारेच उपासना करण्यात आपण समाधानी असले पाहिजे.

● ● ●

# देव मूर्तिपूजेचा तिरस्कार करतो

*''वास्तविक जी माणसे अनीतीने सत्य दाबून ठेवतात त्यांच्या अभक्तीवर व अनीतीवर देवाचा क्रोध स्वर्गातून प्रकट होतो. कारण देवाविषयी प्राप्त होणारे ज्ञान त्यांच्यात दिसून येते; कारण देवाने ते त्यांना दाखवून दिले आहे.*

*कारण सृष्टीच्या निर्मितीपासून त्याच्या अदृश्य गोष्टी म्हणजे त्याचे सनातन सामर्थ्य व देवपण ही निर्मिलेल्या पदार्थांवरून ज्ञात होऊन स्पष्ट दिसत आहेत; अशासाठी की, त्यांना कसलीही सबब राहू नये.*

*देवाला ओळखूनसुद्धा त्यांनी देव म्हणून त्याचा गौरव केला नाही किंवा त्याचे आभार मानले नाहीत; पण ते आपल्या कल्पनांनी शून्यवत झाले आणि त्यांचे निर्बुद्ध मन अंधकाराने भरून गेले.*

*स्वत:ला शहाणे म्हणता म्हणता ते मूर्ख बनले; आणि अविनाशी देवाच्या गौरवाची, नाशवंत मनुष्य, पक्षी, चतुष्पाद पशु व सरपटणारे प्राणी ह्यांच्या प्रतिमांच्या रूपाशी त्यांनी बदलाबदल केली.*

*ह्यामुळे ते आपल्या मनाच्या वासनांत असताना देवाने त्यांना अशुद्धतेच्या स्वाधीन केले; असे की त्यांच्या देहांची त्यांच्या त्यांच्यातच विटंबना व्हावी. त्यांनी देवाच्या खरेपणाची लबाडीशी अदलाबदल केली आणि निर्माणकर्त्याऐवजी निर्मिताची भक्ती व सेवा केली; तो निर्माणकर्ता तर युगानुयग धन्यवादित आहे. आमेन.*

(रोम १:१८-२५)

*पाठ आठ*

**SEEKERS**

# ख्रिस्तामध्ये नवीन जीवन
# NEW LIFE IN CHRIST

ख्रिस्ती व्यक्ती म्हणजे, जी पापाला मेली आहे (पश्चात्ताप), बाप्तिस्म्यामध्ये प्रभू येशूसोबत पुरली गेली आणि जीवनाच्या नाविन्यात उठवली गेली (रोम ६:४); तिचा नवीन जन्म झाला आहे (योहान ३:५). आपण पापाला मेलेले असल्यामुळे आपण *''ख्रिस्त येशूमध्ये स्वत:स पापाला मेलेले खरे, पण देवाप्रित्यर्थ जिवंत झालेले, असे माना''* (रोम ६:११). मग आता येथून पुढे पापाची समस्या राहणार नाही का?

*''ह्यास्तव तुम्ही आपल्या शरीरवासनांच्या अधीन न व्हावे म्हणून पापाने तुमच्या मर्त्य शरीरात राज्य करू नये; आणि तुम्ही आपले अवयव अनीतीची साधने होण्याकरिता पापाला समर्पण करत राहू नका; तर मेलेल्यातून जिवंत झालेले असे स्वत:स देवाला समर्पण करा आणि आपले अवयव नीतीची साधने होण्याकरिता देवाला समर्पण करा''* (रोम ६:१२,१३)


आता आपण *''ख्रिस्ताबरोबर वधस्तंभाला खिळलेले आहोत''* (गलती २:२०). जुना पापी स्वभाव मेला आहे; आपले नवीन जीवन जुन्या जीवनापेक्षा वेगळे असले पाहिजे. आपल्या जीवनात आपल्याला पुष्कळ बदल करायची गरज आहे. आपण पवित्र असले पाहिजे, कारण देव पवित्र आहे (१ पेत्र १:१४-१६). देवाने आम्हाला अशुद्धतेसाठी नव्हे, तर पवित्रतेसाठी पाचारण केले आहे (१ थेस्सल ४:७).

आपण पश्चात्ताप करून, बाप्तिस्मा घेतल्यावर देवाने आमची पापे धुतली आहेत (प्रे.कृ.२२:१६); आपण ख्रिस्ताच्या मंडळीचे सभासद झालो (प्रे.कृ.२:४७). आमचा

विश्वास आणि आज्ञापालन यांच्या आधारे देवाने आमच्या पापांची क्षमा करण्याचे (प्रे.कृ. २:३८); आणि आम्हाला सार्वकालिक जीवन देण्याचे (इब्री ५:९) अभिवचन दिले आहे. त्याच्या अभिवचनांवर आपला विश्वास आहे (कलस्सै २:१२).

*''तेव्हा प्रियजनहो, आपणाला ही अभिवचने मिळाली आहेत, म्हणून देहाच्या व आत्म्याच्या सर्व अशुद्धतेपासून आपण स्वतःला शुद्ध करू आणि देवाचे भय बाळगून पावित्र्याला पूर्णता आणू''* (२ करिंथ ७:१).

पौल ख्रिस्ती विश्वासणाऱ्याची तुलना कपडे बदलणाऱ्या व्यक्तीशी करतो (कलस्सै ३:१-१७). शेतात दिवसभर काम करणाऱ्या मजुराची कल्पना करा. त्याचे हात चिखलाने माखलेले आहेत, त्याचे शरीर घामाने डबडबले आहे (पाप आपल्याला आध्यात्मिकरित्या घाणेरडे करते.) तो घरी येतो आणि मळीन कपडे काढतो. मग साबणाने आंघोळ करून स्वतःला स्वच्छ करतो आणि स्वच्छ कपडे घालतो. आपण आपल्या पापांचा



पश्चात्ताप करतो आणि बाप्तिस्मा घेतो तेव्हा आपण आपले जुने कपडे काढतो आणि ख्रिस्ताच्या रक्तात स्नान करतो.

अजूनही मळीन, घामाचे चिकट झालेले ते जुने कपडे घालायला आपल्याला आवडेल का? अर्थातच नाही. नीतीमत्त्वाचे स्वच्छ, नवीन कपडे घालायला आपल्याला आवडेल. देवाने आपल्याला पवित्र केले आहे, तसे पवित्र राहायची आपली इच्छा आहे (१ पेत्र २:९). पुढील काही वचनात पौलाने ही तुलना केलेली आहे.

*''म्हणून तुम्ही ख्रिस्ताबरोबर उठवले गेले आहात, तर ख्रिस्त देवाच्या उजवीकडे जेथे बसला आहे, तेथल्या वरील गोष्टी मिळवण्याचा यत्न करा. वरील गोष्टींकडे मन लावा. पृथ्वीवरील गोष्टींकडे लावू नका. कारण तुम्ही मृत झाला आहात आणि तुमचे जीवन ख्रिस्ताबरोबर देवामध्ये गुप्त ठेवलेले आहे''* (कलस्सै ३:१-३.

आपली विचारसरणीसुद्धा बदलली पाहिजे (२ करिंथ १०:५). जगिक स्वभावानुसार ज्या गोष्टी आपल्याला महत्त्वाच्या वाटतात, त्यांच्याऐवजी आपल्याला स्वर्गीय (आध्यात्मिक) गोष्टींविषयी जास्त जिव्हाळा, कळकळ वाटली पाहिजे. आपल्याला पुन्हा पापात पाडू शकणाऱ्या सर्व गोष्टी आपण मारून टाकल्या पाहिजे. *''तर पृथ्वीवरील तुमचे अवयव म्हणजे जारकर्म, अमंगळपणा, कामवासना, कुवासना व लोभ ह्याला मूर्तिपूजा म्हणावे-हे जिवे मारा''* (कलस्सै ३:५).

घाणेरडया कपड्यांबरोबर इतर ज्या गोष्टी आपण काढून टाकल्या पाहिजेत, त्याविषयी पौल पुढे बोलतो.

*''परंतु आता क्रोध, संताप, दुष्टपणा, निंदा व मुखाने शिवीगाळ करणे ही सर्व आपणांपासून दूर करा; एकमेकांशी लबाडी करू नका; कारण तुम्ही जुन्या मनुष्याला त्याच्या कृतींसह काढून टाकले आहे; आणि जो नवा मनुष्य आपल्या निर्माणकर्त्याच्या प्रतिरूपाप्रमाणे पूर्ण ज्ञानात नवा केला जात आहे, त्याला तुम्ही धारण केले आहे''* (कलस्सै ३:८-१०)

५ व्या वचनात सांगितलेल्या गोष्टी लैंगिक स्वरूपाच्या आहेत; ८-

१० या वचनात सांगितलेल्या गोष्टी दृष्टिकोन आणि बोलण्यासंबंधी आहेत. आपण ख्रिस्ती होतो, तेव्हा आपण आपल्या जीवनात बदल घडवतो. आपली विचार करण्याची पद्धत बदलते. जीवनाचा विचार केवळ रोजच्या संदर्भात नव्हे, तर सार्वकालिक संदर्भात केला जातो. आता आपल्या दृष्टीने सर्वाधिक महत्त्वाच्या गोष्टी येशू आणि त्याच्या मंडळीशी संबंधित असतात. येशू आपल्या लोकांना (जिवंत अथवा मृत) स्वर्गात घेऊन जाण्यासाठी परत येणार आहे हे आपल्याला माहीत आहे. येशू आपले जीवन आहे (कलस्सै ३:४). तो परत येईपर्यंत (२ थेस्सल १:७-९) आपण त्याला समर्पित असले पाहिजे.

एकेकाळी आपली विचारदृष्टी (दृष्टिकोन) पापी होती, पण आता ती त्यापेक्षा वेगळी असली पाहिजे. राग व्यक्त करण्याऐवजी आपण त्यावर नियंत्रण ठेवले पाहिजे. आपल्या बोलण्यावर आपण नियंत्रण ठेवले पाहिजे, स्वच्छ, शुद्ध केलेल्या जिवामध्ये घाणेरडे तोंड असू नये. घाणेरड्या, वाईट बोलण्यासाठी किंवा लोकांना फसवण्यासाठी आपली जीभ वापरली जाऊ नये. अर्थातच, सत्याला समर्पित असलेले लोक खोटे बोलू शकत नाहीत.

पण ख्रिस्तीत्व हे जुने विचार, दृष्टिकोन आणि कृती सोडून देणे एवढ्यापुरतेच मर्यादित नाही. आम्ही जे कपडे घालावेत असे देवाला वाटते ते कपडे आपण घातले पाहिजेत.

*''तेव्हा तुम्ही देवाचे पवित्र व प्रिय असे निवडलेले लोक आहात, म्हणून करूणायुक्त हृदय, ममता, सौम्यता, लीनता, सहनशीलता ही धारण करा; एकमेकांचे सहन करा आणि कोणाविरुद्ध कोणाचे गाऱ्हाणे असल्यास आपसात क्षमा करा; प्रभूने तुम्हाला क्षमा केली तशी तुम्हीही करा; पूर्णता करणारे बंधन अशी जी प्रीती ती ह्या सर्वांवर धारण करा. ख्रिस्ताची शांती तुमच्या अंत:करणात राज्य करो; तिच्याकरता तुम्हाला एक शरीर असे पाचारण्यात आले आहे; आणि तुम्ही कृतज्ञ असा''* (कलस्सै ३:१२-१५).

स्वत:ला बदलणे ही सोपी गोष्ट

नाही. लोकांच्या ठायी मनाची नम्रता आली पाहिजे; त्यांच्या रागाचे रूपांतर दयाळूपणा, दु:ख सहन आणि एकमेकांचे सहन करणे आणि क्षमाशीलता यात झाले पाहिजे. स्वार्थीपणा प्रीतीत बदलला पाहिजे. ख्रिस्ती व्यक्ती होणे म्हणजे नवीन व्यक्ती होणे-केवळ देवासोबतच्या नातेसंबंधात नाही, तर इतर लोकांशीसुद्धा, आपण स्वत:ला ख्रिस्ताच्या प्रतिमेप्रमाणे केले पाहिजे (रोम ८:२९). धार्मिकतेसाठी आपल्याला दु:ख सहन करावे लागले, तरी आपण ख्रिस्ताचे अनुकरण केले पाहिजे (१ पेत्र २:२१-२४).

हे नवीन जीवन सर्व जगिक नातेसंबंधातसुद्धा ताजेपण आणते. याचा अर्थ असा की आपण चांगले पती किंवा पत्नी होऊ (कलस्सै ३:१८-२१; इफिस ५:२२,२३). आपण चांगले नोकर(सेवक) आणि मालक होऊ (कलस्सै ३:२२; ४:१). आपण चांगले नागरिक होऊ (१ पेत्र २:१३-१७).

ख्रिस्ती असणे, नवीन व्यक्ती, चांगले जगिक नातेसंबंध असणे ही किती गौरवी गोष्ट आहे. सर्वात मोठा आशीर्वाद म्हणजे, सैतानाच्या मुलांप्रमाणे अंधारात न चालता, देवाची मुले होऊन प्रकाशात चालणे.

*''म्हणून जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी असेल तर तो नवी उत्पत्ती आहे; जुने ते होऊन गेले; पाहा, ते नवे झाले आहे'' (२ करिंथ ५:१७).*

## जबाबदाऱ्या

तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून ख्रिस्तामध्ये तुमचा बाप्तिस्मा झाला असेल, तर तुम्हाला पुष्कळ आशीर्वाद आहेत, तसेच तुमच्यावर पुष्कळ जबाबदाऱ्याही किंवा कर्तव्ये आहेत. पहिले कर्तव्य म्हणजे तुमच्या जीवनात देवाला प्रथम स्थान देणे (लूक १४:२६-३३; मत्तय २२:३७-३९). दुसरी जबाबदारी म्हणजे, ''भीत व कापत आपले तारण साधून घेणे'' (फिलिप्पै २:१२).

मग तुम्ही तुमच्या शेजाऱ्यांवर प्रीती केली पाहिजे (मत्तय २२:३९). मंडळीतील बंधुजनांप्रमाणे, जे विश्वासणारे नाहीत, त्यांच्या

बाबतीतही तुमच्यावर जबाबदारी आहे. ख्रिस्ताने जशी आपणावर प्रीती केली तशी सर्व बंधूंनी एकमेकांवर प्रीती केली पाहिजे (योहान १३:३४,३५; १ योहान ४:७-८). एकमेकांना मदत करण्याविषयी उदा. शिकवणे, बोध करणे, उत्तेजन देणे आणि एकमेकांची सेवा करणे, अनेक शास्त्रभाग आहेत (इफिस ३:१३; ५:१९;इब्री ३:१३; गलती ५:१३ आणि इतर अनेक)

जे ख्रिस्ती नाहीत त्यांच्याविषयी काय? आण त्यांच्याशी कसे वागावे ?

*''बाहेरच्या लोकांबरोबर सुज्ञतेने वागा; संधी साधून घ्या. तुमचे बोलणे सर्वदा कृपायुक्त, मिठाने रूचकर केल्यासारखे असावे, म्हणजे प्रत्येकाला कसकसे उत्तर द्यायचे हे तुम्ही समजावे''* (कलस्सै ४:५-६).

पौलाने म्हटले की, मी सर्वांचा ऋणी आहे. तो त्यांना सुवार्तेचे देणे लागत होता (रोम १:१४); तुम्ही ख्रिस्ती असाल, तर तुम्हीही ऋणी आहात. ख्रिस्तावर विश्वास न ठेवणाऱ्या लोकांशी वागताना, या जगात आपण प्रभूचे प्रतिनिधी आहोत हे लक्षात ठेवले पाहिजे. आपण अशा प्रकारे जगले पाहिजे की, लोकांना त्याचे खरे चित्र दिसले पाहिजे.

तुम्ही अजून सुवार्तेचे पालन केले नसेल, तर तुमच्या पापांनी तुमच्यासाठी सार्वकालिक नाश मिळवला आहे, पण तुम्हाला सार्वकालिक जीवन मिळावे ही देवाची इच्छा आहे याचा गंभीरपणे विचार करा (रोम ६:२३).

ख्रिस्ताच्या मंडळ्यामधील कोणाशी तरी संपर्क साधा आणि तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून तुमचा बाप्तिस्मा करण्याची विनंती त्याला करा (प्रे.कृ. २:३८), मग पवित्र शास्त्रात तुम्ही जिच्याविषयी वाचता, जिच्यासाठी ख्रिस्त मरण पावला त्या मंडळीचा तुम्ही भाग बनू शकता. तुम्ही ख्रिस्ती जीवनात वाढत जाल, ख्रिस्ती जीवनात वाटचाल करीत राहाल, तसा देव तुम्हाला विपुल आशीर्वादित करील.

● ● ●

# ख्रिस्ती व्यक्तीची जीवनशैली

*"प्रभूमध्ये सर्वदा आनंद करा; पुन्हा म्हणेन, आनंद करा.*

*तुमची सहनशीलता सर्वांना कळून येवो, प्रभू समीप आहे.*

*कशाविषयीही चिंताक्रांत होऊ नका, तर सर्व गोष्टींविषयी प्रार्थना व विनंती करून आभारप्रदर्शनासह आपली मागणी देवाला कळवा;*

*म्हणजे सर्व बुद्धिसामर्थ्याच्या पलीकडे असलेली देवाने दिलेली शांती तुमची अंत:करणे व तुमचे विचार ख्रिस्त येशूच्या ठायी राखील.*

*बंधूंनो, शेवटी इतके सांगतो की, जे काही सत्य, जे काही आदरणीय, जे काही न्याय्य, जे काही शुद्ध, जे काही प्रशंसनीय, जे काही श्रवणीय, जे काही सद्गुण, जी काही स्तुती त्यांचे मनन करा.*

*माझ्यापासून जे तुम्ही शिकलात, जे स्वीकारलेत व माझे जे ऐकलेत, पाहिलेत ते आचरत राहा; म्हणजे शांतिदाता देव तुमच्याबरोबर राहील."* **(फिलिप्पै ४:४-९)**

• • •

## पाठ १ प्रश्न

## रिकाम्या जागी योग्य उत्तरे लिहा.

१. पवित्र शास्त्र हे खि.पू. ........... पासून इ. ........... या कालावधीत ........... लोकांनी लिहिलेल्या पुस्तकांचा संग्रह आहे.

२. ........... ने प्रेरणा दिल्यानुसार देवाच्या पवित्र लोकांनी संदेश दिला.

३. संपूर्ण शास्त्र देवाच्या ...........ने दिले आहे.

४. पवित्र शास्त्र काय शिकवते ते समजून घेतल्यावरच देवाची ........... कशी करावी ते आपल्याला समजते.

५. ज्याने हे ........... आणि त्यातील सर्व काही निर्माण केले तो एकच देव आहे.

६. प्रारंभी देवाने ........... व ...........निर्माण केली.

७. ..........., ........... , ........... या तीन व्यक्ती देवत्वात आहेत.

८. जुन्या करारात...........आणि नवीन करारात...........पुस्तके आहेत.

९. पहिल्या पाच पुस्तकांना...........म्हणतात आणि ती...........लिहिली होती.

१०. देवाने खास उद्देशाने ...........नावाच्या व्यक्तीला निवडले. त्याच्या वंशजांना........... राष्ट्र म्हटले जाईल. त्या राष्ट्राद्वारे ...........चा जन्म या जगात होईल.

११. जुन्या करारातील बारा पुस्तकांमध्ये (यहोशवा ते एस्तेर)........... राष्ट्राचा एक हजार वर्षांचा इतिहास नोंदला आहे.

१२. नवीन करार आपले लक्ष...........वर केंद्रीत करतो. आपल्याला आपल्या........... साठी तो आला.

**पुढील विधाने खरी की खोटी ते लिहा.**

१. ........... पवित्र शास्त्राच्या लेखकांनी देवाचे विचार न लिहिता स्वतःचे विचार लिहिले.

२. ...........मनुष्याने स्वतःच्या सोयीनुसार देवाच्या वचनात मोडतोड केली तर देवाला त्यात काही वावगे वाटत नाही.

३. ...........जो मनुष्य देवाच्या इच्छेनुसार वागतो केवळ तोच त्याला संतुष्ट करू शकतो.

४. ...........आपण कोणत्या देवाची उपासना किंवा सेवा करतो याने काही फरक पडत नाही.

५. ...........विश्वाच्या देवाला कशाचीही गरज नाही.

६. ...........देव मांस आणि रक्त नाही, तर आत्मा आहे.

७. ........... जुन्या करारात इतिहास, कविता आणि भविष्यसंदेश हे विभाग आहेत.

८. ........... नवीन करार येशूविषयी आहे. त्यातील सर्व पुस्तके इ.स. ४० ते इ.स. १०० च्या दरम्यान लिहिली गेली.

९. ...........रोमकरांस पत्रापासून यहुदाचे पत्र या पुस्तकांमध्ये ख्रिस्ती जीवनशैलीविषयी सांगितले आहे.

१०. ...........नवीन करारातील इतिहासाच्या पुस्तकाला प्रकटीकरण म्हणतात.

११. ........... ज्यांनी देवावर प्रीती केली आणि त्याच्या इच्छेप्रमाणे केले, केवळ त्यांनाच तो प्रतिफळ देतो.

१२. ........... देवाला मान्य होईल आणि त्याला संतोष होईल अशा प्रकारे त्याची सेवा करण्याविषयी पवित्र शास्त्र निश्चित काय शिकवते हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

## पाठ २ प्रश्न
## रिकाम्या जागी योग्य उत्तरे लिहा.

१. ........... हा पहिला मनुष्य आणि ........... ही पहिली स्त्री होती. देवाने त्यांना ...........बागेत ठेवले.

२. देवाचे नियम मोडणे म्हणजे ........... पण या समस्येवर उपाय आहे.

३. ...........आपण देवाकडे आले पाहिजे आणि सुवार्तेचे ........... कसे करावे हे शिकले पाहिजे.

४. ''देवाचा पुत्र'' हा शब्दप्रयोग येशूच........... दाखवतो; ''मनुष्याचा पुत्र'' हा शब्दप्रयोग त्याचे ...........दाखवतो.

५. ''येशू'' या नावाचा अर्थ '' ...........'' असा होतो.

६. आपण देवाचा पुत्र आहोत हे येशूने ..........., ...........आणि ........... करून दाखवले.

७. येशूने ...........नावाच्या मनुष्याला मेलेल्यांतून उठवले.

८. प्रमुख याजक येशूला ठार मारू इच्छित होते, कारण लोक त्याला अनुसरतात हे पाहून त्यांना त्याचा........... वाटला.

९. देवाने येशूला ........... उठवले. आता तो...........आणि ........... आहे.

१०. येशूचे निष्कलंक...........आमच्या ...........साठी सांडले आहे.

११. सार्वकालिक शिक्षा टाळण्यासाठी आपण ...........कडे आले पाहिजे आणि सुवार्तेचे ...........कसे करावे हे शिकले पाहिजे.

१२. मानवाला ...........मुक्त करण्याची देवाची योजना आपल्याला प्रथम बागेत दिसते.

**पुढील विधाने खरी की खोटी ते लिहा.**

१. ...........पापाचे वेतन मरण, देवापासून सार्वकालिक विभक्तीकरण आहे.

२. ...........येशू हा नवीन कराराचा विषय आहे.

३. ...........येशू सार्वकालिक नाही.

४. ........... येशू अर्धा मनुष्य आणि अर्धा देव होता.

५. ........... मरिया नावाच्या कुमारीच्या पोटी येशूचा जन्म झाला.

६. ...........येशू त्याच्या पित्याच्या बरोबरीचा होता.

७. ...........पाच भाकरी आणि दोन मासे यांच्याद्वारे येशूने एकदा ५,००० लोकांना जेवू घातले.

८. ...........येशूने कधीही पाप केले नाही.

९. ...........येशूला वधस्तंभावर खिळले, तेव्हा मनुष्यजातीला त्यांच्या पापांपासून सोडवण्याची ती देवाची योजना होती.

१०. ...........येशू वधस्तंभावर मेला नसता, तरी मानवाला तारण मिळू शकले असते.

११. ........... ख्रिस्त देवाचा पुत्र आहे हे त्याने केलेल्या चमत्कारांमुळे सिद्ध झाले.

१२. ...........एके प्रसंगी येशूने यहुद्यांना सांगितले, ''अब्राहामाचा जन्म झाला त्यापूर्वी मी आहे.''

## पाठ ३ प्रश्न
## रिकाम्या जागी योग्य उत्तरे लिहा.

१. देवाची आज्ञा पाळण्यास नकार देणे म्हणजे...........होय.

२. मनुष्याने देवाच्या सत्याची...........शी अदलाबदल केली.

३. तारण प्राप्त होण्यासाठी व्यक्तीने ...........च्या प्रीतीचा स्वीकार केला.

४. जगात ...........आणि ...........या दोन प्रकारचे लोक आहेत.

५. व्यभिचार, समलिंगीसंबंध आणि दारूबाजी ही........... पापे आहेत.

६. गर्व, मत्सर आणि द्वेष ही ...........ची पापे आहेत.

७. ...........करणे कळत असून जो ते करीत नाही, त्याला ते पाप आहे.

८. पापाचे वेतन ........... आहे, देवाचे कृपादान ........... आहे.

९. आपल्या दूतांसह येशू स्वर्गातून प्रगट होईल तेव्हा, जे देवाचे...........धरत नाहीत, आणि त्याच्या ........... पाळत नाहीत, त्यांचा सूड उगवील.

१०. देवाने आमच्या पापांची शिक्षा ........... ला घेऊ दिली.

११. देव ...........आहे, म्हणून पापाला शिक्षा करणे त्याला भाग आहे, पण तसेच आमच्या पापांपासून आम्हाला मुक्ती देणारा मार्ग उपलब्ध करून देणारा तो आमचा ........... आहे.

१२. येशू हा ........... भाग असल्याने, रोम ३:२६ मधील ‘देव ........... आणि येशूवर ...........नीतीमान ठरवणारा आहे’ या पौलाच्या म्हणण्याचा अर्थ आपल्याला समजतो.

## पुढील विधाने खरी की खोटी ते लिहा.

१. ...........चोरी करणे पाप आहे.

२. ...........सत्याचा नकार करणे पाप आहे.

३. ...........चूक, अयोग्य गोष्टींनी आंधळे होऊन सार्वकालिकरित्या हरवले जाण्याची अनुमती देव लोकांना देतो.

४. ...........सर्वजण जरी नाही, तरी पुष्कळ लोक पापाबाबत दोषी आहेत.

५. ........... देवासोबतच्या आमच्या सहभागितेवर पापाचा परिणाम होत नाही.

६. ...........देव पवित्र असल्याकारणाने तो पापाला संमती देऊ शकत नाही, किंवा पापासोबत सहभागिता ठेवू शकत नाही.

७. ...........प्रत्येकजण सर्वकाळ दु:ख सहन करण्यास पात्र आहे.

८. ...........प्रत्येकाने सर्वकाळ दु:ख सहन करावे असे देवाला वाटते.

९. ...........देवाने पापाला शिक्षा करण्याची गरज नाही.

१०. ...........विदेश्यांनी सत्य नाकारले आणि ते मूर्तीपूजक झाले.

## पाठ ४ प्रश्न

## रिकाम्या जागी योग्य उत्तरे लिहा.

१. येशूने ...................... केले नाही.

२. आमच्या पापांसाठी येशूने आपले...................... सांडले; त्याशिवाय ...................... मिळत नाही.

३. सैनिकाने त्याच्या कुशीत भाला भोसकला तेव्हा आणि ...................... बाहेर पडले.

४. प्रत्येक माणसासाठी येशूने आध्यात्मिक ...................... सोसले

५. तारण हवे असेल तर देव आहे आणि येशू हा त्याचा .................... आहे असा विश्वास आपण बाळगला पाहिजे. आपण जर विश्वास ठेवणार नाही, तर आपण आपल्या

६. सर्वांनी सर्वत्र......................करावा अशी आज्ञा देव करतो. आपण जर तसे केले नाही, तर आपलाही

७. पश्चात्ताप म्हणज.................... आणि जगिक................... नाकार करणे (तीत २:११,१२).

८. पेन्टेकॉस्टच्या दिवशी पेत्राने लोकांना सांगितले, ‘तुमच्या पापांची ......................क्षमा व्हावी म्हणून......................करा व ......................घ्या.

९. आपला ......................होतो तेव्हा ख्रिस्ताचे .................... आमची पापे......................टाकते.

## पुढील विधाने खरी की खोटी ते लिहा.

१. ...........देव आपली कृपा ज्यांच्यावर करणार नाही अशी काही राष्ट्रे आहेत.

२. ...........येशूने आमच्या पापांची खंडणी भरली.

३. ...........येशू त्याच्या रक्ताने आमची पापे धुऊन टाकतो.

४. ........... वधस्तंभावर येशूची त्याच्या पित्यासोबतची सहभागिता तुटली.

५. ........... लोकांनी काहीही केले तरी सर्वांचे तारण होईल.

६. ........... पश्चात्ताप म्हणजे आपल्या पापांसाठी दु:ख होणे, पण याचा अर्थ आपण आपली जीवनशैली बदलावी असा होत नाही.

७. ........... येशू हा देवाचा पुत्र आहे असे कबूल करणे तारणासाठी आवश्यक आहे.

८. ........... बाप्तिस्म्याचा तारणाशी काही संबंध नाही.

९. ........... व्यक्तीने विश्वास ठेवल्यानंतर आणि बाप्तिस्मा घेतल्यानंतर तारण होते.

## पाठ ५ प्रश्न

## रिकाम्या जागी योग्य उत्तरे लिहा.

१. बाप्तिस्मा ........... आहे.

२. पापक्षमा......................साठी बाप्तिस्मा घ्या असे पेत्राने लोकांना शिकवले.

३. शौलाचा (पौल) बाप्तिस्मा झाला, तेव्हा त्याची ...................... धुतली गेली.

४. देवाचे वचन हे मनुष्याच्या अंत:करणात पेरलेले ...................... आहे.

५. हबशी षंढाला येशूविषयी शिकवल्यानंतर त्याने म्हटले, ''मला बाप्तिस्मा घेण्यास......................आहे ?

६. सुवार्तेची संक्षिप्त व्याख्या म्हणजे आमच्या ......................साठी येशूचे मरण, त्याचे ......................, आणि त्याचे ............

७. पश्चात्ताप (पापाला मरणे) आणि बाप्तिस्मा सिद्धांताचे ........... आहेत.

८. बाप्तिस्मा झाल्यानंतर ............................................. चालण्यासाठी आपण उठवले जातो.

९. फिलीप्प आणि हबशी षंढ असे दोघेही ...........त गेले आणि ......................च्या बाहेर आले.

१०. बाप्तिस्मा हा येशूचे मरण, पुरले जाणे आणि पुनरुत्थान यांचे ...................... आहे.

## पुढील विधाने खरी की खोटी ते लिहा.

१. ........... आपला बाप्तिस्मा होतो त्या क्षणी येशूचे रक्त आपली पापे धुऊन टाकते.

२. ........... बाप्तिस्मा तारणासाठी आवश्यक नाही.

३. ........... शौलाचे (पौल) तारण दिमिष्काच्या रस्त्यावर झाले.

४. ........... शौलाचे (पौल) तारण त्याने केलेल्या उपासामुळे व प्रार्थनेमुळे झाले.

५. ........... बाप्तिस्मा ही ''नवीन जन्माच्या'' प्रक्रियेतील शेवटची पायरी आहे.

६. ........... बाप्तिस्मा झाल्यावर फिलिप्पै येथील तुरूंगाधिकारी व त्याच्या कुटुंबियाने आपल्या तारणासाठी आनंदोत्सव केला.

७. ........... सुवार्तेचे पालन न करणाऱ्या व्यक्तीचा नाश होईल.

८. ...........शिंपडणे आणि बाप्तिस्मा हे दोन्ही सारखेच आहेत.

९. ........... पवित्र शास्त्रीय बाप्तिस्म्यामध्ये व्यक्ती पूर्णपणे पाण्याखाली झाकली जाते.

१०. ...........बुडवून बाप्तिस्म्याऐवजी शिंपडून बाप्तिस्मा मिळणारी पहिली व्यक्ती नोवाशियन ही होती. इ.स. २५० मध्ये त्याचा शिंपडून बाप्तिस्मा झाला.

११. ...........बाप्तिस्मा म्हणून ''पाणी शिंपडणे'' आणि ''ओतणे'' हे केवळ मानवी परंपरावर आधारित आहे.

१२. ...........रूढी-परंपरा या देवाची आपण केलेली उपासना निरर्थक करतात.

## पाठ ६ प्रश्न

## रिकाम्या जागी योग्य उत्तरे लिहा.

१. ख्रिस्ती विश्‍वासणारा आपली पापे ......................कबूल करतो.

२. ......................मध्ये आपण ख्रिस्ताच्या रक्ताच्या संपर्कात येतो.

३. मंडळी म्हणजे ख्रिस्ताचे .

४. येशू ......................संगोपन करतो आणि काळजी घेतो.

५. मंडळी या शब्दाने कधीकधी विश्‍वासणाऱ्यांच्या ...........समुहाचा बोध होतो, तर कधी विश्‍वासणाऱ्यांच्या ......................समुहाचा बोध होतो.

६. ''आपणा सर्वांना ......................बाप्तिस्मा मिळाला आहे. आणि आपण सर्व संचरित झालो आहोत.''

७. ख्रिस्ती विश्‍वासणाऱ्यांनी ......................व ...............जोडलेले व्हावे.

८. ख्रिस्ती लोकांत फुटी पडतत तेव्हा ते ......................असल्याचे चिन्ह आहे.

९. विदेशी या नात्याने आपण ...................... शिवाय होतो; आपल्याला ......................नव्हती.

१०. आपण स्वतःला ......................ठेवावे, ......................दृष्ट्या वाढावे, आणि मंडळीत आपले ......................करणारे भाग किंवा अवयव आपण आहोत हे लक्षात ठेवावे.

११. जगातील ......................पासून मंडळी तयार करण्यात आली.

## पुढील विधाने खरी की खोटी ते लिहा.

१. ........... येशूच्या रक्ताने धुतली जाऊ शकत नाहीत अशी काही पापे आहेत.

२. ........... बाप्तिस्म्याद्वारे आपण ख्रिस्त पांघरतो.

३. ........... ख्रिस्ती व्यक्तीने पाप केल्यावर, तिने पुन्हा बाप्तिस्मा घेतला पाहिजे.

४. ........... तारण झालेल्या व्यक्तीची भर देव मानवाने निर्माण केलेल्या पंथात घालतो.

५. ........... मंडळीला एक मस्तक आणि अनेक शरीरे आहेत.

६. ........... केवळ एकच मंडळी आहे, आणि ख्रिस्त तिचे मस्तक आहे.

७. ........... ख्रिस्ताने आमच्यामध्ये असलेली आडभिंत पाडून यहुदी व विदेशी यांना एक केले आहे.

८. ........... सर्व वंशांच्या स्त्रिया आणि पुरुष मंडळीत एक होऊ शकतात.

९. ........... ख्रिस्ती असणे हा मोठा सन्मान असून त्यात मोठ्या जबाबदाऱ्यांचाही समावेश आहे.

## पाठ ७ प्रश्न

## रिकाम्या जागी योग्य उत्तरे लिहा.

१. देवाला आपली ......................अर्पण करण्यासाठी ख्रिस्ती लोक ......................................................(रविवारी) एकत्र जमतात.

२. भाकर ही वधस्तंभावर मोडले गेलेल्या येशूच्या ......................चे प्रतिक आहे; द्राक्षारस हा त्याच्या ..........................चे दर्शक आहे.

३. आपली ज्या प्रमाणात भरभराट होईल त्या प्रमाणात आठवड्याच्या ......................दिवशी आपण द्यावे अशी आज्ञा पौलाने ख्रिस्ती लोकांना दिली.

४. प्रेषित पवित्र आत्म्याच्या ......................ने बोलले.

५. आपल्याला शिकवले जात आहे याची खात्री करून घेण्यासाठी आपण ......................पवित्र शास्त्राचा ......................केला पाहिजे.

६. ख्रिस्ती व्यक्तींना ...................... प्रार्थना करण्यास शिकवले आहे. आपल्या विनंत्या ...................... नसाव्यात.

७. ..................... , ...................... व ................यांनी ख्रिस्ती लोकांनी एकमेकांशी बोलले पाहिजे.

८. देवाने ज्या प्रकारे उपासना करायला सांगितली होती, त्यात ...................... नावाच्या मनुष्याने बदल केला. त्यामुळे राष्ट्राने ...................... पाप केले. उपासनेबाबत देवाने केलेल्या नियमांत ...................... किंवा त्यातून काही ...................... कोणालाही अधिकार नाही.

## पुढील विधाने खरी की खोटी ते लिहा.

१. ...........आपण वैयक्तिकरित्या देवाची उपासना करू शकत असल्याने, मंडळीत एकत्र येण्याची आपल्याला गरज नाही.

२. ...........सत्य हा उपासनेचा महत्त्वाचा भाग नाही; तर केवळ प्रामाणिकपणाची गरज असते.

३. ...........''भाकर मोडणे'' म्हणजे प्रभुभोजन.

४. ...........ख्रिस्ती लोकांनी महिन्यातून एकदा प्रभुभोजनाचा विधी पाळला पाहिजे.

५. ...........देवाच्या लोकांनी आनंदाने द्यावे अशी देवाची अपेक्षा नाही.

६. ...........देवाच्या वचनाचा अभ्यास करण्यामुळे आपली आध्यत्मिक वाढ होते.

७. ...........देव आमच्या प्रार्थना-विनंत्या ऐकू इच्छित नाही.

८. ...........स्तोत्रेगीते गाण्यासोबत वाद्यांची साथ करायची अनुमती नवीन करार देत नाही.

९. ...........ख्रिस्ती विश्वासणारे जे शिकवतात किंवा आचरण करतात त्यासाठी त्यांना अधिकाराची गरज नाही.

## पाठ ८ प्रश्न

## रिकाम्या जागी योग्य उत्तरे लिहा.

१. व्यक्ती ख्रिस्ती झाली, तरी तिला ......................समस्येवर विजय मिळवायचा आहे. आपण पापाला ......................आहोत आणि देवाप्रित्यर्थ ......................झालेले आहोत हे आपण लक्षात ठेवले पाहिजे.

२. ख्रिस्ती होणे म्हणजे आपले ......................कपडे काढून ......................कपडे घालणे.

३. ख्रिस्ती व्यक्तीने ......................गोष्टींवर नव्हे, तर ......................गोष्टींवर लक्ष केंद्रीत केले पाहिजे.

४. आपण ख्रिस्ती होतो तेव्हा आपल्या जीवनात आपण ......................करतो.

५. ......................व्यक्तीमध्ये ......................तोंड असू नये.

६. ......................रूपांतर दयाळूपणात आणि
चे रूपांतर प्रीतीत झाले पाहिजे.

७. आपण स्वत:ला ख्रिस्ताच्या प्रतिमेप्रमाणे......................पाहिजे.

८. आपले तारण ......................व कापत
घ्यायला आपल्याला सांगण्यात आले आहे.

९. आपल्या जीवनात आपण देवाला ......................स्थान दिले पाहिजे आणि आपल्याप्रमाणे आपल्या शेजाऱ्यांवर ...................केली पाहिजे.

## पुढील विधाने खरी की खोटी ते लिहा.

१. ...........देव पवित्र आहे, आणि त्याने आपल्याला पवित्रतेसाठी पाचारण केले आहे म्हणून आपण पवित्र राहिले पाहिजे.

२. ...........जे देवावर विश्वास ठेवतात आणि त्याच्या आज्ञा पाळतात त्यांना त्याने सार्वकालिक जीवन देण्याचे अभिवचन दिले आहे.

३. ...........व्यभिचार आणि इतर लैंगिक पापे दूर ठेवली पाहिजेत.

४. ...........ख्रिस्ती व्यक्तीने कधीतरी क्रोधित होणे आणि खोटे बोलणे योग्य आहे.

५. ...........ख्रिस्ती व्यक्ती आपली विचारसरणी, आपला दृष्टिकोन, बोलण्याची पद्धत आणि वागण्याची पद्धत बदलते.

६. ...........आपल्या लोकांना स्वर्गात घेऊन जाण्यासाठी येशू परत येणार आहे.

७. ...........ख्रिस्ती विश्वासणारे होण्यामुळे आपण चांगले पती, पत्नी, सेवक आणि नागरिक होतो.

## विनंती अर्ज

## ताबडतोब भरून आमच्याकडे पाठवा

नोंदणी क्र.......................

१. नाव : ...............................................................

२. वडील/ पतीचे नाव : ...............................................

३. पत्ता : ..............................................................

पीन कोड : ................................

४. स्त्री / पुरुष ५. जन्मतारीख : ........... ६. वय : ...........

७. विवाहित / होय / नाही ८. शिक्षण : ......................

९. धर्म : ...................... १०. व्यवसाय : ......................

११. चर्चचे नाव : .......................................................

१२. प्रचारकाचे नाव : .....................................................

कृपया या पाठांविषयी तुमच्या मित्रमैत्रिणींना आणि नातेवाईकांना सांगा. तुम्ही त्यांचे पत्तेदेखील आम्हाला पाठवू शकता.

दि. विद्यार्थ्याची सही

## शोधकांसाठी पवित्र शास्त्र अभ्यासमालिका

## कार्यालयीन उपयोगासाठी

१. नोंदणी क्र.

२. पाठ श्रेणी स्मरण पत्र - दिनांक

१.______________________________________

२.______________________________________

३.______________________________________

४.______________________________________

५.______________________________________

६.______________________________________

७.______________________________________

८.______________________________________

३. प्रमाणपत्र पाठवण्यासंबंधीचा तपशील :

होय / नाही दिनांक ............... व्यक्ती .......

४. नवीन करार / पवित्र शास्त्र दिले आहे का ? होय / नाही

५. विद्यार्थी बाप्तिस्मा घेण्यास तयार आहे का? होय / नाही

कार्यालयात मिळाल्याची तारीख कार्यालयीन सेवकाची सही

पवित्र शास्त्र
(The Bible)

येशू-देवाचा दैवी पुत्र
(Jesus - The Divine Son of God)

पापाची समस्या
(The Problem of Sin)

पापापासून तारण
(Salvation from sin)

पाण्याचा बाप्तिस्मा
(Water Baptism)

मंडळी
(The Church)

खरी उपासना
(True Worship)

ख्रिस्तामध्ये नवीन जीवन
(New Life in Christ)